म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं 3223

# वीणा



सौ. सरस्वतीबाई चंद्रचूड

REFBK-0004251

किंमत ८ आणे

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ६१०७
७/१२/३०
ठाणे

# वीणा

४२५१



REFBK-0004251

कै. सौ. सरस्वतीबाई चंद्रचूड

किंमत ८ आणे

मुद्रक—गणेश काशिनाथ गोखले,
सेक्रेटरी, श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स,
४९५-४९६ शनिवार पेठ, पुणें शहर.

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन.

प्रकाशकः—डॉ. चिंतामण नरसिंह चंद्रचूड,
M. B; B. S. Bom; F. R. F. P. S. Glas
M. R. C. P Ed.
१३१ बुधवार पेठ, पुणें २.

# निवेदन.

माझ्या पत्नीनें लिहिलेला हा काव्यांचा व गोष्टींचा संग्रह रसिक वाचकांचे हातीं मकरसंक्रांतीचे दिवशीं देतांना माझ्या मनांत जे विचार उद्भूत होतात ते यथार्थानें व्यक्त करून दाखविणें मला तरी शक्य नाहीं. कवयित्रीच्या हयातींत कविता जसजशा लिहून होतील तसतशा तात्रडतोब प्रसिद्धीसाठीं पाठवाव्या असें मी वारंवार सुचवीत असतांही विनयामुळें तिनें 'पुढें पाहूं' असें म्हणून वेळ मारून न्यावी. पुढें तिच्या मृत्यूनंतर तिच्या वर्षश्राद्धाचे दिवशीं शक्य तर हा संग्रह प्रसिद्ध करावा असें मनाला वाटे, परंतु तेव्हां मी विलायतेंत असल्यामुळें तो बेत रहित करावा लागला. अखेरीस आज मकरसंक्रांतीस हा संग्रह वाचकांचे हातीं पडत आहे या गोष्टीबद्दल प्रकाशकाला समाधान वाटतें. मकरसंक्रांत हा सण एरवीं निर्मळ आनंदाचा खरा; परंतु प्रस्तुत संग्रहाच्या प्रसिद्धीकरणामुळें 'तिळगुळ' देणें व 'तिलांजली' देणें या परस्परविरुद्ध क्रिया प्रकाशकाचे हातून घडत आहेत या गोष्टीच्या जाणिवेनें त्याला अत्यंत दुःखच होत आहे.

प्रस्तुत संग्रह चांगला आहे किंवा वाईट आहे याविषयींचें कसलेंही विवेचन प्रकाशक करूं इच्छित नाहीं. 'तत्तस्य किमपि द्रव्यं यो हि यस्य प्रियो जनः' या भवभूतिप्रणीत न्यायाप्रमाणें दिवंगत अशा प्रियतम व्यक्तीची मागें कायमची उरणारी कृति म्हणून प्रस्तुत संग्रहावर

त्याचें ममत्व आहे; तेव्हां प्रस्तुत ठिकाणीं कोणत्याही प्रकारचा विस्तार न करतां आभारप्रदर्शनाच्या कार्याकडे प्रकाशक वळत आहे.

कवयित्रीचें माहेर संगमनेरचें. तेथेंच तिचें शिक्षण झालेलें. संगमनेर येथील हायस्कुलांत शिक्षक असलेले, महाराष्ट्राचे एक सुप्रसिद्ध कवि श्री. केशव लक्ष्मण टेंभुर्णीकर यांनीं आपल्या शिष्येच्या अंगीं कवित्व-शक्ति आहे हें ओळखून तिच्या प्रतिभालतिकेला योग्य वळण लावलें. कवयित्रीच्या निधनानंतरही सदर संग्रह प्रकाशित करण्याचा आग्रह प्रकाशकाला त्यांनींच केला, व कविता प्रसिद्ध करण्यासारख्या आहेत अशीहि त्याची खातरजमा केली, व म्हणूनच प्रकाशक हें धाडस करण्यास प्रवृत्त झाला. कांहीं कवितांना मथळे नव्हते ते देणें, कांहीं कवितांच्या चाली बसविणें वगैरे कोणत्याहि काव्यसंग्रहाच्या प्रसि-द्धीला जरूर असणाऱ्या सर्व खटपटी श्री. टेंभुर्णीकरांनीं मोठ्या हौसेनें केल्या, एवढेंच नव्हे तर सदर संग्रहाला अल्प परिचय लिहून दिला म्हणूनच हें पुस्तक प्रसिद्ध करतां आलें. या बाबतींत आभार मानणें ही गोष्ट खुद्द श्री. टेंभुर्णीकरांना आवडणार नाहीं हें खरें असलें तरी त्यांच्याविषयींची कृतज्ञता जाहीरपणें व्यक्त करणें हें प्रकाशकाचें मह-त्त्वाचें कर्तव्य आहे व तें त्यानें बजावलेंच पाहिजे.

त्याचप्रमाणें श्री. नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर यांनीं आपल्या मागें, विशेषत: सध्यां, अत्यंत महत्त्वाचीं कामें असतांना वेळांत वेळ काढून व प्रकाशकाच्या विनंतीला मान देऊन सदर संग्रह

वाचला व त्यावर ताबडतोब आभिप्रायही दिला याबद्दल प्रकाशक त्यांचा ऋणी आहे.

शेवटीं कवि गं. ल. ठोकळ यांनीं पुस्तकप्रसिद्धीचे कामीं जी योग्य मदत केली याबद्दल त्यांचे व श्रीगणेश प्रिंटिंग प्रेसचे सेक्रेटरी श्री. गणेश काशिनाथ गोखले यांनीं छपाईचें काम वक्तशीर व सुबक करून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानून रसिकांना या 'वीणे'चा नाद कायमचा तल्लीन करून सोडो अशी इच्छा प्रदर्शित करून हें लांबलेलें 'निवेदन' पुरे करतों.

ता. १३ जानेवारी, १९३०
१३१ बुधवार,
पुणें २.

चिंतामण नरसिंह चंद्रचूड.

# परिचय.

कै. श्री. सौ. सरस्वतीबाई चंद्रचूड यांच्या या "वीणा" पुस्तकाला परिचयादाखल चार शब्द मी लिहावे अशी कवियत्रीचे पति डॉ. चिंतामणराव चंद्रचूड यांनीं प्रेमाग्रहयुक्त इच्छा व्यक्त केल्यावरूनच मी हा अल्प परिचय लिहीत आहे. परिचय लिहितांना—

कळी उमलली जों न पावली पूर्ण विकासाला
अदयकराचा तोंच तिजवरी पडला कीं घाला !

या विनायक कवीच्या काव्यपंक्तीची आठवण झाली, व ज्या काळानें ज्या हृदयावर कठोर घात्र घातला त्या हृदयाशीं समरस होऊन त्याच काळाला पुनः

ढाळूं सारे अगतिक अम्ही आसवें, ना उपाय
दुःखाची त्या तुजसि अमुच्या कल्पना सांग काय !

हेंही निवेदन केल्यावाचून राहावत नाहीं. प्रथम कवियत्रीच्या जीवितवृत्तांताचा अल्प परिचय देत आहे.

"निसर्गभिन्नास्पदमेकसंस्थम् । अस्मिन् द्वयं श्रीश्चसरस्वती च"

या कालिदासोक्तीप्रमाणें सरस्वतीचा व लक्ष्मीचा मधुर संगम होणें कठिण, कदाचित् झाल्यास तें काळास रुचणें त्याहून कठिण.

प्रस्तुत कवयित्री, संगमनेरचे प्रसिद्ध वकील श्रीमंत भाऊसाहेब संत यांच्या कन्या होत. त्यांचें माहेरचें नांव सुंदर असून नांवाप्रमाणेंच त्या रूपगुणानेंही सुंदर होत्या. त्यांचा विवाह पुण्याचे सुप्र-

(stamp)

सिद्ध वकील आमदार बाबासाहेब चंद्रचूड यांचे चिरंजीव डॉ. चिंतामणराव ऊर्फ आप्पासाहेब चंद्रचूड यांजबरोबर झाला. विवाहोत्तर सरस्वती हें नांव ठेवण्यांत आलें. प्रस्तुत पुस्तकाचेंही नांव "वीणा" असल्यामुळें माहेरचें नांवांत, सासरचें नांवांत, पुस्तकाचें नांवांत एक प्रकारची स्वाभाविक रम्यता आलेली आहे. शिक्षण घरींच झालें होतें तरी त्यांना वाचनाचा नाद फार असे; विशेषतः ऐतिहासिक व पौराणिक ग्रंथ वाचनाची भारीच आवड होती. वाचण्यासाठीं एका वेळीं १०-१२ ग्रंथ जरी लायब्ररींतून आणले तरी "इतकींच पुस्तकें आणिलीं का ?" असे त्यांचे तोंडून शब्द निघत असत असें ऐकिवांत येत असे. त्या शिवण व विणकामांत कुशल असत. प्रस्तुत लेखकास त्यांचे ठिकाणीं काव्यगुण उत्कट रीतीनें वास करतात हें माहीत असल्यामुळें प्रस्तुत लेखकाला त्यास योग्य वळण देण्याची संधी लाभली होती. सर्व प्रकारची अनुकूलता असूनही समाधानवृत्ति साधेपणा व निगर्वीपणा हे त्यांच्या स्वभावांतील वैशिष्ट्य होतें. शाळेंतील कोणत्याही तऱ्हेचें उच्च शिक्षण न मिळालें तरी त्यांचें मन सुसंस्कृत व आर्यस्त्रीचें असल्यामुळें त्यांच्या विचाराची उदात्तता नेहमीं त्यांच्या आचरणांत दिसत असे व काव्यांत आणि गोष्टींतही ती प्रतीत होत आहे.

संक्रांतीला प्रस्तुत पुस्तक प्रसिद्ध होत आहे. त्या दिवशीं प्रियजनांकडून तिळगुळ घेण्याच्या व त्यांस देण्याच्या गोड प्रसंगीं कव-

यित्रीच्या प्रेमळ पूर्वस्मृतीनें आप्तेष्टांचें हृदय तिळतिळ तुटेल यांत शंकाच नाहीं पण जो जीवात्मा संक्रांत झाला त्याच्या हृदयभावना पुस्तकरूपानें संक्रांतीचे दिवशीं प्रकट झाल्यामुळें त्यांस दुःखांत तिळभर तरी समाधान वाटेल. पण " संक्रांतीच्या हलव्यांत "

" पुढील वर्षीं संक्रमण दिनिं अभ्यासक्रम आटपुनी
स्वदेशिं यावें श्रीयशकीर्ती मानधन्यता मिळवोनी
हीच प्रार्थना निशिदिनिं करिते श्रीनरहरिचे चरणांला "

चंद्रचूडांचे कुलस्वामी श्रीनरहरीस कवयित्रीनें प्रार्थना केल्याप्रमाणें यश, कीर्ती,धन्यता मिळवून स्वदेशीं चिंतामणराव आल्यावर संक्रमणदिवशीं प्रेमाचे प्रत्यक्ष तीळ देण्यास सहचारिणी नाहीं ही वस्तुस्थिति त्यांचे हृदयाला निश्चित जाळील. त्यांच्या मनस्थितीचें वर्णन शब्दांत करणें अशक्य !

कवयित्रीच्या कवितावर किंवा गोष्टीवर नियतकालिकाच्या प्रसिद्धीचा छाप यापूर्वीं केव्हांच पडला नसल्यामुळें आकस्मिकरीतीनें हा संग्रह पुढें येत आहे हें पाहून कित्येकांस आनंद व आश्चर्य वाटेल. अलीकडे बाजारभाव उतरलेल्या काव्यपुस्तकांच्या भरताडांत या पुस्तकाची आणखी भर पडली असेंही कुणास कदाचित् वाटण्याचा संभव आहे. पण प्रसिद्धीची तळमळ कवयित्रीचे ठिकाणीं नसल्यामुळें व प्रसिद्धी पाहून मिळालेल्या संतोषापेक्षां आपल्या पतीला कविता आवडतात या भावनेमुळें होणाऱ्या संतोषाचें मोल त्यांना अधिक

वाटत असल्यामुळें झटपट प्रसिद्धी देणाऱ्या मासिक किंवा वर्तमानपत्राच्या राजरोस मार्गावर त्यांनीं पाऊल ठेवलें नाहीं. शिवाय रुचिवैचित्र्याच्या कठिण कसोटीवर काव्यकनकाची रेषा कोणत्या कसाची आहे हा बाजारभाव काव्याची थोडी पुंजी झाल्याबरोबर अजमावून पाहाण्यापेक्षां परिश्रमपूर्वक काव्यव्यासंगाचा संस्कार त्यावर करीत रहावा असेंच त्यांना अधिक श्रेयस्कर वाटत होतें; पण कवयित्रीच दिवंगत झाल्यावर आहे तो संग्रह स्वतःच्या व आप्तेष्टांच्या संतोषासाठीं व श्रीसरस्वतीची बरीवाईट अशी सेवा जनताजनार्दनाचे चरणीं अर्पण करण्यासाठींच केवळ डॉ. चिंतामणराव प्रसिद्ध करीत आहेत. तेव्हां बाविसाव्या वर्षी देहाचा त्याग करून जाणाऱ्या स्त्रीच्या कवितांचा व गोष्टींचा संग्रह मोठा असेल अशी अपेक्षाही कुणी करणार नाहीं.

या ठिकाणीं 'वीणा' पुस्तकाचें सूक्ष्म निरीक्षण करावयाचें नाहीं. तें काम रसिक मर्मज्ञाचें आहे. प्रस्तुत संग्रह एका दृष्टीनें अपूर्व आहे. आजपर्यंत अनेक कवयित्रींच्या स्फुट कविता प्रसिद्ध झाल्या आहेत, कांहीं दिवंगत कवयित्रींचे संग्रह प्रसिद्ध झाले आहेत, कांहीं विदुषी स्त्रिया गोष्टीही लिहीत आहेत, पण या पुस्तकांतील विशेष हाच कीं, यांत स्फुट कविता असून एक खंड काव्य आहे व दोन लघुकथा आहेत. खंडकाव्यें हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या कवींनीं आजपर्यंत लिहिलीं आहेत मग कवयित्रींचा विचारच करणें नको! पण कै. सौ. सरस्वतीबाईनीं मात्र स्फुटकाव्यें, खंडकाव्य व लघुकथा-लेखनाचे

बाबतींत कवयित्रींत पहिला मान मिळवला आहे असें मला तरी वाटतें. शिवाय तारुण्यसहज श्रृंगारचेष्टांचें वर्णन कोठेंच आलें नसलें तरी काव्यरसाची माधुरी ह्यांत असल्यामुळें तें सर्वांचे आदरास पात्र होईल असें वाटत आहे. ज्या स्त्रियांना आपल्या देशाची दैना पाहवत नाहीं व पूज्य हिंदुधर्मावर परधर्मीयांचे होत असलेले हल्ले सहन करवत नाहींत त्या आर्य स्त्रियांनीं सदर पुस्तक आपल्या भावाच्या हातांत द्यावें व " भाउबीज " कवितेंतील—

" पाहा भाउराया काळ कसा फिरला—भगिनिच्या राखी शीलाला
धर्मभगिनिसाठीं तनुमनधन झिजवी—आजही भाउबीज येई
ओवाळणि घाली आज मला ही रे—हृदयीं जागृति ठेवी रे ! "

अशी कवयित्रीनें मागितलेली ओवाळणी आपल्या भावापाशीं सांप्रतकाळीं मागावी, व कवयित्रीप्रमाणेंच परमेश्वरापाशीं " प्रार्थना "

" पराधीनता घोर श्रृंखला-पदिं पडलि, वालि नुरला
करुणागारा दीनोद्धारा—घेइ पुन: अवतारा
ऊठ, धाव घे, दीनदयाळा—तारि तारि घननीला
स्वातंत्र्याची प्रभा पसरुं दे—हीच विनति प्रभु तुजला "

दररोज भक्तिभावानें करावी, व "स्वामी श्रद्धानंदाचे स्वर्गारोहणां"तला

उठा बंधुनो स्वधर्मकार्या

असा उद्बोधक उपदेश आपल्या बंधूस करावा, व " देशासाठीं " लिहिलेल्या लघुकथेंतील एका तरुणास देशद्रोहासारख्या भयंकर पापा-

पासून मुक्त करणाऱ्या एका गरीब गुलाब नांवाच्या सुंदर कुमारिकेचें डोळ्यापुढें चरित्र ठेवावें अशी मी शिफारस करतों.

संगमनेरांत तरी बऱ्याच मुलींच्या तोंडीं " प्रार्थना " " लोकमान्यांचें पुण्यस्मरण " व " स्वामी श्रद्धानंदजींचें स्वर्गारोहण " हीं काव्यें आहेत.

' संक्रांतीचा हलवा, मार्गप्रतीक्षा, चंद्रास शाप ' या मनोहर कवितांत विरहव्याकुल हृदयाचें करुणरसपूर्ण शब्दचित्र पाहावयास मिळतें.

'मार्गप्रतीक्षा'—सहवासाच्या सौख्यसागरीं सकलविश्व न्हालें
मार्गप्रतीक्षा करीत नाथा ! एकटीच बसले

सर्व जग सहवासाच्या सुखांत मग्न व आपणच काय ते मार्गप्रतीक्षा एकटे पतीच्या मार्गाकडे डोळे लावून बसलेल, हा दुःखदायक विचार रात्रंदिवस कवयित्रीच्या मनांत सारखा घोळत राहिल्यामुळें व क्षयासारख्या दुर्धर रोगानें ग्रासल्यामुळें अखेर पतीच्या मार्गावर डोळे लावूनच अत्यंत खेदपूर्ण स्थितींत त्यांची या भूवरची यात्रा समाप्त झाली !

' एक दृश्य ' ' निसर्ग देवी ' या कवितांत सृष्टिसौंदर्याचें वर्णन मोहक आहे.

' सयाजी सुवर्णमहोत्सव ' या कवितेंतील श्रीमंत सयाजीरावांचें गुणवर्णन यथातथ्य केलें असल्यामुळें अशा राजाविषयीं कुणालाही

आदर वाटल्यावांचून राहाणार नाहीं. व

“ दीर्घायुर्यश–कीर्तिधन दे ईशा अमुया राजाला ”

असें कवयित्रीप्रमाणेंच कुणाचेही सहजोद्गार निघतील.

पाळणा ऐन गर्दींत रचला असला तरी

‘ सुखकर हो सकला–राष्ट्राला--उद्धरि निजदेशाला’

देशाची दैन्यावस्था पाहून त्याचा उद्धार व्हावा ही अंतस्थ तळमळ पाळण्यांत व्यक्त झाली आहे.

‘ विनवणी ’—प्रपंचीं रमोनी तुला आठवावें,

अशी बुद्धि दे, मागणें हेंचि द्यावें.

प्रपंचांत रमून परमेश्वराची आठवण ठेवण्याची बुद्धि सर्वांस होईल तर प्रपंच साधून परमार्थाची प्राप्ति सहजासहजीं होईल.

‘ मालेची समाधी ’ हें खंडकाव्य फार सुंदर साधलें आहे.

सोनगांवच्या शिवरावानें आपल्या एकुलत्या एक माला नांवाच्या सुंदर मुलीचें लग्न वसंत नांवाच्या सुशील गरीब कुमाराशीं लावलें. पद्माकर नांवाच्या एका श्रीमंत नराधमाला मालेविषयीं अभिलाषबुद्धि उत्पन्न होते. त्याच्या दुर्बुद्धीचा दुष्परिणाम

‘ बळी घेतला नराधमाच्या कामाच्या गरळें ’

कवयित्रीच्याच शब्दांत देणें अधिक उचित. माला आपल्या पती-बरोबर सती जाते. या तिच्या उज्ज्वल पतिनिष्ठेनें व श्रीमंताला भाळून न जातां धडधडत्या चितेस सानंद स्वदेह समर्पिल्यानें पद्माकराच्या

मनांत केलेल्या दुष्कृत्याची जळजळ उत्पन्न होऊन तो पश्चात्तापानें होरपळतो, व मालेची समाधी बांधून तिची पूजा करीत राहातो असें गोड शब्दांत वर्णिलें आहे. खंडकाव्यांतील नांवें आधुनिक तऱ्हेचीं असून माला सती जाते असें दाखविलें आहे. अलीकडे सती जाणें कायद्यानें स्त्रियांस बंद केली आहे तरी कवि-कवयित्रीला कायद्याचें बंधन बाधूं शकत नाहीं. कवयित्रीच्या मनाची घडण जुन्या वळणाची असल्याकारणानें सतीची कल्पना काव्यदृष्ट्या अधिक हृदयभेदी आहे असें त्यांस वाटण्याचा बराच संभव आहे. या मनोहर काव्यांतील उतारे देण्याचा मोह आवरत नाहीं; पण विस्तारभयास्तव फक्त दोन तीन चरणांचेंच दिग्दर्शन करतों.

जात पोरिची आंच लाविते बापाच्या हृदया.

प्रत्येक उपवर मुलीच्या बापाच्या डोळ्यापुढें वरचें सुभाषित एकसारखें उभें राहील. वसंत आणि मालेचें लग्न झाल्यावर

प्रीतिरसाची सुधा सेविती दोघे आकंठ
गरिबाच्या झोंपडींत आले उतरुन वैकुंठ

या दोनच ओळींत त्यांच्या प्रेमाच्या व सुखाच्या सूचकत्वाची परिसीमा उत्कट रीतीनें सहजसुंदर शब्दांत उतरली आहे. प्रीतीच्या पोटीं वैकुंठांतील सुखें असतात, दारिद्र्याच्या प्रखर निखाऱ्यावर प्रीतीचें अमृत पडल्यावर त्याचे कोळसे होतात, हा मनोहर रम्य ध्वनि हृदयाला चटका लावील व संसार सुखाचा होण्यासाठीं जो तो प्रीतीचीच निःसंशय आशा करील.

Treasures of the Deep are not so precious as are the concealed comforts of a man locked up in a woman's love.

या इंग्रज लेखकाच्या लिखाणांतील स्वारस्य याच प्रीतींत आहे. रत्नाकराच्या पोटीं असलेल्या अनर्घ्य रत्नांच्या खाणीच्या प्राप्तीनें जें सुख होत नाहीं तें सुख या प्रीतीनें प्राप्त होतें. 'केवळ संशय' ही लघुकथादेखील मनोहर आहे. कलेचें एक मुख्य अंग जें 'संयम' त्याचा अभाव अलीकडील बऱ्याच लघुकथा-लेखकांचे ठिकाणीं दिसून येतो तसाच अनुभव कै. सौ. सरस्वतीबाईंच्या लघुकथेंत दिसून आल्यास नवल नाहीं. तरी पण त्यांत प्रसंगवैचित्र्य, स्वभावरेखन, रचनाकौशल्य व भाषासौंदर्य चांगलें आहे.

सारांश, स्फुटकाव्यें, खंडकाव्य, व लघुकथा या वीणेवरील सहज एकादी तार छेडली तरी त्याच्या सुरेलपणानें निःसंशय आनंद होईल. माधुर्य,वर्णनशैली, भाषासौंदर्य इ० गुण व स्त्रीजातीला अनुरूप असेच विचारप्रवाह कै. सौ. सरस्वतीबाईंच्या लिखाणांत त्यांच्या वयाच्या व व्यासंगाच्या मानानें बऱ्याच अंशानें विकसित झालेले दिसतात. या अशाच प्रकारचें उत्तम वाङ्मय निर्माण होण्यासाठीं लागणाऱ्या गुणांचा उत्तरोत्तर विकास होत जावो अशी इच्छा करायला काळानें जागा ठेविली नाहीं तरी पण आहे या संग्रहावर संतुष्ट राहून

ग्रे कवीनें म्हटल्याप्रमाणें

Full many a gem of purest ray serene
The dark unfathomed caves of ocean bear

Full many a flower is born to blush unseen
And waste its sweetness on the desert air.

अशी वस्तुस्थिति जरी खरी आहे तरी डॉ. चिंतामणरावांनीं हीं काव्यें व लघुकथा उगमस्थानींच अंतर्धान होऊं दिलीं नाहींत याबद्दल त्यांचें अभिनंदन करून प्रस्तुत ' वीणा ' पुस्तकाच्या प्रकाशनानें कै. सौ. सरस्वतीबाईंच्या आत्म्याचें संतर्पण होवो येवढेंच इच्छून हा मर्यादेबाहेर गेलेला परिचय आटोपतों.

**केशव लक्ष्मण टेंभुर्णीकर** संगमनेर.

जिल्हा—चिटणीस, वाङ्मयोपासक मंडळ, अहमदनगर.

८–१–१९३०

# अभिप्राय.

डॉ. चंद्रचूड यानी आपल्या मृतपत्नीसंबंधाचा स्मृतिग्रंथ मजकडे दिला तो मी वाचून पाहिला. तो वाचून फार खेद झाला. वाटले की असा होतकरू जीव अकाली नाहीसा होणे हे दुर्भाग्य होय. ग्रंथातील लेख वाचून कौतुक वाटले असेही म्हणता येण्यासारखे आहे पण ते शब्द मी मुद्दामच वापरीत नाही कारण आपण कौतुक कशाचे करितो? अर्थात् जी गोष्ट अनपेक्षित तिचेच. पण पुरुषाप्रमाणे स्त्रियांच्या अंगी ललितवाङ्मय निर्माण करण्याची पात्रता असणे ही गोष्ट अनपेक्षित का म्हणावी? स्त्रीच्या निसर्गघटनेत असे काय आहे की ज्यामुळे त्यांच्याहातून पुरुषाप्रमाणे काव्य कथा निबंध नाटके इत्यादि लिहिली जाऊ नयेत? पण आपण या प्रश्नाचे नकारार्थी उत्तर जणू काय ठरल्यासारखेच घेऊन चालतो. पण हा स्त्रीजातीचा उपमर्द नव्हे काय? व कौतुक करण्यामध्ये जरी प्रेमळ उपकारित्वाची भावना असली तरी तिच्यातून निघणारा व वर दर्शविलेला स्वाभाविक नालायकीचा ध्वनी हा निंदाव्यंजक व उपमर्दकारक असाच ठरतो. गोल्डस्मिथच्या citizen of the world (विश्वाचा नागरिक) या निबंधसंग्रहात एका इंग्रज बाईचे विनोदी वर्णन केले आहे. तिने प्रवासात असता चीन देशातील एक दायी किंवा अय्या खरेदी करून आपल्या बरोबर विलायतेस नेली आणि मग जो कोणी घरी येईल त्याच्यापुढे मोठ्या कौतुकानें तिने त्या दाईला उभे करावे मागे पुढे फिर म्हणावे

व मोठ्या आश्चर्याने सांगावे "पाहा ही चिनी स्त्री तोंडाने जेवते की हो". कोणाही स्त्रीच्या सुशिक्षितपणाबद्दल विद्वत्तेबद्दल रसिकतेबद्दल किंवा बुद्धिमत्तेबद्दल आपण जेव्हां आश्चर्यमूलक कौतुक प्रकट करतो तेव्हा या इंग्रज स्त्रीनें आरंभिलेला खुळेपणाच करीत नसतो काय? तात्पर्य या पुस्तकातील कविता व गोष्टी वाचून लेखिकेच्या बुद्धिमत्तेला व रसिकतेला उद्देशून कौतुक करण्याचा मोह गर्विष्ठ पुरुष जातीला सामान्य असा माझ्या मनात उत्पन्न झाला होता पण तो मी वरील विवेकाने आवरला.

खेद मात्र खरोखरच वाटला व याचकरता की लेखिकेने अल्पवयात जे वाङ्मयनैपुण्य प्रकट केले त्याचा विस्तार करून स्वतःला व तिच्या पतीला आनंददायक व भूषणभूत अशी वाङ्मयसंतति निर्माण करण्याचे कार्य तिचे अपुरे पडले. स्वतः डॉ. चंद्रचूड हे उच्च प्रतीचे डॉक्टरी शिक्षण मिळवून आले आहेत व अर्थात् जन्मभर ते तोच धंदा करणार. स्वतः त्याना वाङ्मयासंबंधी अभिरुची कितपत आहे हे मला माहीत नाहीं पण स्वतःला ही अभिरुची असण्याखालोखाल स्पृहणीय अशी दुसरी गोष्ट म्हणजे निदान आपल्या पत्नीच्या वाङ्मयनिष्णाततेचे चीज करणें (येथेही पुन्हा कौतुक शब्द डोकावत होता पण तो मी टाळला). डॉ. चंद्रचूड यानी अकाली मृत्यू पावलेल्या आपल्या पत्नीचे स्मारक या ग्रंथप्रसिद्धीच्या रूपाने करण्याचे योजले याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. त्यांच्याशी

प्रत्यक्ष संभाषण करण्याला त्यांची पत्नी आता जिवंत नाही तथापि या लहानशा ग्रंथातील कोणतेही पान ते चाळतील तेव्हा त्याना तिच्याशी संभाषण केल्याचे निदान तिचे बोलणे ऐकण्याचे जिवंत सुख खचित लाभेल. शिवाय कवितातील काही कविता तर स्वत: त्याना उद्देशून लिहिलेल्या असून ते विलायतेत असता म्हणजे अल्प विरहावस्थेत त्यांच्याकडे सांत्वनार्थ धाडलेल्या आहेत आणि आता त्यानंतरचा त्यांचा विरह चिरकालिक व निरवधी असला तरी तेव्हा-प्रमाणे आताही त्यांचे सांत्वन तसेच करण्याची पात्रता या लेखात व कवितात खचित आहे अशी माझी समजूत आहे.

**न. चिं. केळकर.**

ता० ९।१।३०.

# अनुक्रमणिका.


प्रार्थना .... १
संक्रांतीचा हलवा .... २
मार्गप्रतीक्षा .... ४
चंद्रास शाप .... ५
भेट .... ७
एक दृश्य .... ८
सरितेस .... ११
निसर्गदेवी .... १२
धरीं अधरीं तूं वेणू .... १४
थांबवी मुरली नंदलाला .... १५
सयाजी सुवर्ण महोत्सव .... १७
गोड गळा कोणाचा .... १९
कठिण हृदय .... २१
विषय–विष .... २३
लोकमान्यांचें पुण्यस्मरण .... २५
स्वामी श्रद्धानंदांचें स्वर्गारोहण .... २६
पाळणा .... २७
भाऊबीज .... २८

| | |
|---|---|
| विनवणी .... .... .... | २९ |
| श्रीकृष्णास .... .... .... | ३१ |
| मालेची समाधि .... .... .... | ३२ |
| देशासाठीं .... .... .... | ४० |
| केवळ संशय .... .... .... | ५१ |



कै. सौ. सरस्वतीबाई चंद्रचूड.

जन्मः—भाद्रपद शु. १५ शके १८२७

मृत्युः—ज्येष्ठ शु. १५ शके १८४९

“ गेली हाय सरस्वती त्यजून सकलां स्वर्गामध्यें गावया
वीणेचा रव मात्र घुमतो, मृत्यू न ठावा तया. ”

कै. ल. टें.

# वीणा.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ८२५७

## प्रार्थना.

**चालः—** जमुना तट राम........

कमलानन उघडि रम्य नयनाला कमलानन, ॥ ध्रु० ॥
दीन जनाचा विलाप परिसुन—लव न द्रव हृदयाला
प्रियकांतेच्या भुलुनी तनुला—घालिसि कां तिज भुजमाला
पराधीनता घोर श्रृंखला—पदिं पडलि, बालि नुरला
करुणागारा दीनोद्धारा—घेइ पुन्हा अवतारा
ऊठ धाव घे दीनदयाळा—तारि तारि घननीळा
स्वातंत्र्याची प्रभा पसरुं दे—हीच विनति प्रभु तुजला

---

# संक्रांतीचा हलवा.

( प्रस्तुत कविता कवयित्रीनें आपल्या पतीला विलायतेंत १९२६ च्या जानेवारींत संक्रातीचां हलवा म्हणून पाठविली होती. )

**चाल:**–धन्य शिवाजी.......

संक्रांतीचा दिन सौख्याचा उधळी चोंहिकडे हर्ष
नव युवतीच्या वदनीं नाचे आनंदाचा उत्कर्ष
सौभाग्यादि वायन देती निजमैत्रिणिला सुभगवती
तिळगुळ देतां परस्परांना "गोड गोड बोला वदती"
मुलीस गंमत वाटे भारी हळदिकुंकवा जातांना
फूलपांखरासमान दिसती थाट तयांचा बघतांना
आप्तेष्टांतें निजदयितांतें तिळगुळ देती नरनारी
असा सुमंगल समय भासतो मला एकटीला वैरी
जरी शेंकडो कोस दूर ही अपुली दासी चरणाची
नाथा ! देते तीळ मनानें वृद्धि असों द्या प्रेमाची
प्रेमरूप हे तीळ घेउनी पाक भक्तिनें मी केला
कांटा आला शुभ्र त्यावरी दावि मनांतिल हेतूला
नयनमनोहर फुलाफुलांतिल मधु जेंवी सेवी भ्रमर
केवळ घ्यावें ज्ञानसुधेतें, पसरितसे दासी पदर
पुढील वर्षीं संक्रमणदिनीं अभ्यासक्रम आटपुनी

स्वदेशीं यावें श्रीयशकीर्ती मानधन्यता मिळवोनी
हीच प्रार्थना निशिदिनिं करिते **श्रीनरहरिचे** चरणांला
तोच दयाब्धी मोह आवरी धीर देत या अबलेला
विद्यादेवी प्रसन्न ज्यातें काय उणें जगतीं त्याला
‘ **सरस्वती** ’ ही दासी असतां मग कां शंका अपुल्याला ?

---

# मार्गप्रतीक्षा.

( प्रस्तुत कविता कवयित्रीनें आपल्या पतीस ते विलायतेंत असतां पाठविली होती. )

**चालः—चंद्रकांत राजाची कन्या....**

भ्रमरावरती बाहुबंध मृदु नलिनीचे पडले
कुक्षीं अपुल्या वृक्षवरानें लतेसही धरिलें
दिग्देवीच्या वक्षावरतीं भानुबिंब निजलें
मार्गप्रतीक्षा करीत नाथा ! एकटीच बसले ॥ १ ॥
प्रेमालिंगन हर्षे देई सरिता सिंधूला
प्रेमसागरीं दंग जाहली ही सृष्टीबाला
निशादेविनें पतिच्या अंकीं मस्तक ठेवीलें
मार्गप्रतीक्षा करीत नाथा ! एकटीच बसले ॥ २ ॥
वसुधा मुग्धा शीतकराच्या पडली करजालीं
निशानाथ हा तारासंगें करीतसे केली
सहवासाच्या सौख्यसागरीं सकल विश्व न्हालें
मार्गप्रतीक्षा करीत नाथा ! एकटीच बसले ॥ ३ ॥

# चंद्रास शाप.

( कवयित्रीनें आपल्या आजारीपणांत प्रस्तुत कविता आपल्या पतीस विलायतेंत पाठविली होती. )

**चाल**:––चंद्रकांत राजाची कन्या....

निशीथसमयीं नीलनभाच्या विशाल चौकांत
विलासवति तारका घेउनी ये तारानाथ
सकलकलांही पूर्ण विकसलें गगनीचें फूल
वसुंधरेवरि पडली शीतल जरतारी झूल
स्मितें आपुल्या विश्वा हसवी हा तारानाथ
नवनवलाचें लेणें पाहुन हसला दिक्प्रांत
गगनधरेचें स्मित सुंदर हें शशिरूपें आलें
पाहुन आनंदानें देवहि वेडावुन गेले
स्वार होउनी मनोवारुवरि जाऊं या गगनीं
दृश्य मनोरम तेथुन पाहूं, पोहूं शशिकिरणीं
सुरम्य सौधावरी कुणाची ही ललना बसली
साक्षात् कोणी तपस्विनी जणुं भूवरि अवतरली
शीतकराच्या स्पर्धेतव ही शुभ्रवसन ल्याली
रवि तेजाची गोळी वळुनी लावि कुंकु भाळीं
केश मोकळे स्कंधावरुनी सर्पाकृति रुळती
भूषणरहिता सुहासिनी ती दिसे रम्य मूर्ती

शशिस्मितातें पाहुन परि ती रुष्ट मनीं झाली
" विरहानलिं मी जळें, हससि कां " चंद्राला वदली
" हात जोडिते तुला विनविते ही विरही अबला
आवरि आवरि किरणें अपुलीं दु:ख होइ मजला
करस्पर्श तव शीतल मजला साहवे न आतां
वृथा जाळिसी विरही ह्रदया हे तारानाथा "
कुसुम कोमला कृशांगि अबला बोलतसे शशिला
" दु:ख मनीचें मलाच ठावें, सांगू कवणाला
लव न साहवे विरह मला हा हे रजनीनाथा
कशी कळावी ह्रदयवेदना मम जीवननाथा
उत्साहातें स्थान मिळेना लव अंत:करणीं
कांहिं सुचेना चित्त लागलें नाथाच्या चरणीं
पतिसहवासांतील सुखाचे दिवस आठवूनी
प्रतिमा पतिची प्रभुची गणुनी पूजी दिनरजनी
मला सोडुनी जातां लवही दु:ख न त्यां झालें
कठोर असती पुरुष जगीं हें प्रत्ययास आलें
दु:खदग्ध मी आधिच, अबला साह्य तया देसी
शीतल किरणें भूवरि पसरुनि मला दु:ख देसी
क्षय तुज लागो उद्या पासुनी माझा शाप तुला "
वदतां वदतां दु:खाश्रूनें पदर तिचा भिजला.

# भेट.

चालः—प्रिये पहा रात्रीचा....

नवयुवती सुभगवती मुग्धा ही दिसत कोमला ॥ ध्रु० ॥

मुक्त केशभार रुळत
मुखचंद्रा लाजवीत
शुभ्रवसन परिवेष्टित ॥ ती सुमंगला ॥ १ ॥

मधुर तिचे अधर हलत
हळु हळु ती उद्गारत
'मम चित्ता भ्रांति पडत ॥ नाठवे मला ॥ २ ॥

अजुन पत्र कां न येत
नाथ मजासि कीं विसरत'
शंका येई मनांत ॥ अश्रु टिपकला ॥ ३ ॥

इतुक्यांतचि नवल होइ
परिचित तिज हांक येइ
दचकुनि जों वरति पाहि ॥ पति दिसे तिला ॥ ४ ॥

बाहूच्या बंधनांत
मुग्धा पडली क्षणांत
प्रेमाचा हर्षभरित ॥ सिंधु उसळला ॥ ५ ॥

---

# एक दृश्य.

चालः—अजि अक्रुर....

मी एक दिनीं प्रात:समयीं बघतां
मधु दृश्य वेधि मम चित्ता
जणुं गगनींचा नीलवर्ण हा गोषा
टाकुनी उषा ये सहसा
क्षण देखुनिया कलाहीन चंद्राला
तिज खेद अतीशय झाला
ती वदत जणों चंद्राच्या रमणीला
चंचल अति जगतीं अबला
तो तेजोहत शशि होतां
सोडुनी तुम्ही त्या जातां
परि पुन्हा तेज त्या येतां
शशिभवतींही साऱ्या सत्वर येतां
किती चंचल तुमची ममता
ही तारांची चंचलता पाहून
जावया निघे परतून
परि तोंच तिच्या विचार मानसिं आला
कीं " वचन दिलें अरुणाला "

येईल सखा अरुणहि माझ्याकरितां
आकाश भेदुनी आतां
नच दिसतां मी त्या नयनीं
मजसाठीं वेडावूनी
मज शोधिल गगनाऽरण्यीं
क्षण लपतांही मेघाच्या कुंजांत
होई झणिं व्याकुल चित्त
परि वेडीला जग हें ठाउक न्हतें
शीलानुसारि जग असतें
ही प्रभा सदा अंशुमालिसह राहि
जरि ताप न सहवे लवही
ती भासे चंचल चपला
परि सोडी नच मेघांला
तो कृष्णरूप जरि झाला
तो तिमिरपती सोडि न संध्याबाला
सहवासीं सुख हो तिजला
मधुगंधहि तों उधळित दाहि दिशांला
मंदानिल सन्निध आला
कथि कांहिं तिला, दृष्टि तिची नभिं गेली
रोहिणी तिला तों दिसली

तो क्षीणतनू निष्प्रभ शशि जरि झाला
सोडी न सती निज पतिला
रोहिणी शशीची रमणी
निज पतिस देव ती मानी
जाहली लीन पतिचरणीं
त्या पतीव्रता रोहिणीस पाहून
उजळलें उषेचें वदन
मग म्हणे मनीं अतां इथें राहीन
सृष्टिही मुदें निरखीन
मत्प्राणसखा येइल जेव्हां गगनीं
अर्पीन देह तच्चरणीं
निजनाथ सवें घेऊन
गगनांगणिं मी विहरेन
गाईन प्रभूचें गान
ये अरुण सखा नाथ तिचा लवलाही
प्रेमाचा संगम होई.

---

# सरितेस.

**वृत्तः**—शार्दूल विक्रिडित.

पाणी शांत अथांग निर्मळ तुझ्या विस्तीर्ण पात्रांतरीं
खेळे मोहक हास्य सुंदर तुझ्या गंभीर लाटांवरी
पाहोनी रमणीय वैभव तुझें हें चित्त आनंदलें
पूर्णत्वाप्रत वाटते मज तुझें सौभाग्य हें पावलें
नेसोनी घननील रम्य वसना देहास शृंगारिसी
फेसाची अतिशुभ्र कंचुकि नवी वक्षावरी घालिसी
जासी वाहत सारखी झरझरा मागें न तूं पाहसी
गाणें मंजुळ गात गात अपुल्या तंद्रीमधें डोलसी
पांथस्था सुखवूनिया तरुवरा देसी सदा जीवन
जासी सत्वर तूं सदैव पुढती काळास धिक्कारुन
जाणें हें तव पाहुनी लगबगा माझ्या मनीं येतसे
नाथाला अपुल्या कुणी विरहिणी भेटावयास जातसे
जेव्हां धाडितसे निरोप तुजला मेघासवें सागर
जासी फोडुन तूं पहाड दरडी त्याच्याकडे सत्वर
औत्सुक्यें पथ आक्रमून सगळा जैं सागरा भेटसी
कांताच्या स्वरुपांत लीन सरिते होऊनियां राहसी
होवो लीन तुझ्यासमान सरिते नाथस्वरूपीं सती
हा ऐसा पतिभक्तिचा शिकविसी तूं मार्ग आम्हांप्रती.

# निसर्ग देवी.

**चालः**–हे प्रभो विभो अगाध.......

ही निसर्गदेवी नटवितसे सृष्टिला ॥ ध्रु० ॥

हें सुंदर उपवन पाहे
जणुं तिचें क्रिडास्थानाचि हें
किति रम्य दृश्य दिसताहे
ये वसंतही मदतीला –१

ही धरणी हिरवा शेला
नेसुनी घालि कंचुकिला
ताटवा गुलाबी फुलला
लुटितसे पवन गंधाला –२

पालवी तरूंना फुटली
वेलीवर कलिका फुलली
मधुपाची स्वारी आली
शोधित फिरे कमलिनिला –३

पंकांत उगवली नलिनी
फुलतसे फुलांची राणी
सौंदर्यमदानें भरुनी
करि मतिभ्रष्ट भ्रमराला –४

मधुसाठीं मधुप भुकेला
गात गात तेथें गेला
सेवी मग मकरंदाला
तों अवचित मिटली कमला —५

बा भृंगा ! मुकशी जीवा
देउनी दोष तव दैवा
कां करिसि अतां पस्तावा ?
फसलास पडुनि मोहाला —६

भ्रमरासम मनुजा असशी
विषयास फार भुलतोसी
जातोस अंतिं विलयासी
मुकुनिया सकल सौख्याला —७

---

# धरीं अधरीं तूं वेणू.

चालः—होई विजयी तूं रंभे........

धरीं अधरीं तूं वेणू कन्हैया—
जगास रंजवाया, काढि मधु रवाला ॥ ध्रु० ॥

मधुर वाजवी
गोपि मोहवी
रवें ब्रह्म डोलवी—करुनि मायेला —१

शरदसमय तो
रम्य भासतो
अशा समयिं क्रीडतो—घेइ राधेला —२

स्वरुप सुंदरा
अति मनोहरा
सकल सगुण सागरा—नमन मुकुंदाला —३

मं. काव्य नं.



# थांबवी मुरली नंदलाला.

**चालः**—विपरीत काल हा.....

कन्हैया थांबवी मुरली नंदलाला !
हस्त जोडोनिया प्रार्थी गोपबाला
कुंजभुवनीं गोपमेळा मेळवीसी
धरुनी अधरीं मंजु मुरली वाजवीसी
गोकुळीच्या गोपललना मोहवीसी
जादुगारा—खेळ अपुरा—तुझा सारा
असा ठेवोनिया छळिसी मन्मनाला
कालियाच्या शिरावरती क्रीडतोसी
वदनकमलें लाजवीसी तूं विधूसी
भास्करासम प्रखर तेजें शोभतोसी
मोह घाली—तुझी मुरली—वृत्ति रमली
हृदयकुंजीं तुझी मूर्ती सुखवी विमला
द्रव न ये कां अजुनि तुजला सदयहृदया
क्षणभरी तूं थांबवी रे वेणुला त्या
चित्त तुजला अर्पिलें, ही परी काया
दुजा चरणीं—दिली दानीं—चक्रपाणी
व्यर्थ भुललें जगांतिल या मृगजलाला

भावभक्ति सर्व कांहीं तुझे ठायीं
वाहिलें मी दुःखसुख हें तुझ्यापायीं
पुन्हा मजला नको घालूं व्यर्थ मोहीं
भेदभावा–नसे ठावा–हृदयिं देवा
सुमति देईं प्रभो आतां सरस्वतिला

---

# सयाजी सुवर्णमहोत्सव.

( बडोद्याचे अधिपति **श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड** यांचा सुवर्णमहोत्सव १९२६ च्या जानेवारींत बडोदें मुक्कामीं झाला. कवयित्रीही त्याच वेळीं बडोद्यास होती. )

**चालः**—हरिची भगिनी म्हणे ........

नृपति सयाजीराव लाभले गुजराथेंतिल जनतेला
म्हणती प्रेमें " कलियुगिं भूवरि साक्षात् भगवान् अवतरला "
सन अठराशें शहात्तरामधिं राजश्रीनें या वरिलें
नृपपदपंकज यशमधु सेवनिं नीति-मधुपही रत झाले
अत्युत्साही उद्यमप्रिय जे राजकारणीं अति दक्ष
परदेशामधिं असतांनाही ठेविति निजराज्यीं लक्ष
राज्यीं अपुल्या प्रजेस सगळ्या सौख्य कशानें होईल
सरस्वती संपदा शांति ही त्रयी कशानें नांदेल
चिंतन याचें हृदयिं निरंतन सेविति जो नितमार्ग बरा
कलाभुवनही गिरण्या काढुनि उत्तेजन दे व्यापारा
विहग जरी आकाशीं फिरती लक्ष पिलावरती जैसें
प्रजेवरी परदेशीं असतां ठेविति अपुलें लक्ष तसें
राज्यव्यवस्था स्वयेंचि बघती प्रजादुःख आणि निवारिती
बघति अहर्निश प्रजाधिकारी प्रजेस कैसें वागविती

अशा नृपतिचा स्वर्णमहोत्सवदिन अजि आला उदयाला
दीर्घायुर्यश-कीर्तीधन दे ईशा! अमुच्या राजाला
सकल प्रजाजन एक मनानें करुणा भाकिति देवाला
ठेवी " देवा सुखी निरंतर अमुच्या पालनकर्त्याला "
यावत्-रवि-शशि गगनीं गावो प्रजा सयाजी गुणगाना
चंद्रचुडांची स्नुषा " **सरस्वति** " हेंच विनविते प्रभुचरणा.

---

# गोड गळा कोणाचा ?

## चालः—हरिची भगिनी म्हणे....

प्रभातसमयीं वसंतऋतुंतिल उपवनिं मी सहजी गेलें
आम्रमंजिरी गंध सेवुनी प्रफुल्ल मानस मम झालें
रव तो सुस्वर मधुर मनोहर वातावरणीं निनादला
मधुर गायनीं चित्त रंगलें देहभावही मावळला
होती रमणी गात मनोहर परि वदले तेथें कोणी
किती पिकाचें सुस्वर गाणें, गोड गळा मंजुळ वाणी
रमणी गातां तिला पिकाची, कोकिळेसही रमणीच्या
मधु कंठाची उपमा देती, वृत्ति विलक्षण किती कविच्या
कुहू कुहू हा शब्द खरोखर कठोर कितितरि भासतसे
स्वतंत्र ऐशी कविस कल्पना दुजी कवीला काय नसे ?
दुरून बघतां काक वदे कुणि कोकिळ हा येथें बसला
दुसरा कुणि त्या नच बघतांही वानि तयाच्या वाणीला
जगीं जहाली तशीच गतही केवल कोकिल शब्दाची
रसिकांनो मी तुम्हां सांगते गोष्ट मनोहर गमतीची
कविमित्राच्या घरीं एक कवि सहजचि बसला असतांना
प्रतिभा त्याची गुंफित होती नवनव सुंदरशा कवना
काव्यानंदीं दंग जाहला, ऐके अवचित मधुगान
म्हणतो ‘ मित्रा सांग कोण रे गाई घेई मधुतान ’

मित्र मनाशीं म्हणे ऐकतों रोज गान मम भगिनीचें
काव्यानंदीं दंग जाहला चित्त ठिकाणीं नच याचें
म्हणे विनोदें 'गाइ कोकिळा' तन्मय काव्यीं कवि होता
कल्पित कवनीं कुहू कुहूला वर्णी "सुस्वर" मधु गातां
काव्य वाचिलें कविचें कोणी, महती वर्णी पिक शब्दाची
गोष्ट धिनोदाची ही असतां, झाली जगतीं परि साची
रसिक जनांनो खरेंच सांगा, भगिनी तुमची विचारिते
गान पिकाचें कीं रमणीचें सांगा सांगा आवडतें.

---

## कठिण हृदय.

**चालः**——वैशाख मास वासंतिक....

पुरुषांतें कठिण हृदय देइ विधि किती
दाविति जरि कोमलता परि न सत्य ती ॥ ध्रु० ॥

वदति मधुर ‘ तुजवरती प्रेम मम असे—
तूंच सत्य हृदयाची स्वामिनी’ असे
स्वार्थी प्रीती पतिची मनिं न आणि ती
मानिति पतिवचन सत्य नित्य जगिं सती —१

स्वमनिं म्हणे ‘भाग्याची थोर मी असे—
मजसमान दैववान जगिं कुणी नसे ’
आनंदीं ह्याच मग्न राहते सदा
संशय पतिप्रेमाचा घेइना कदा —२

परि दैवा सौख्यकाळ मुळिं न आवडे——
स्वामिनि हृदयाची जधिं मृत्युमुखिं पडे
करि सेवा शुश्रुषाहि पति सदा जरी
हाय हाय दैव दुष्ट तिजसि परि हरी —३

दुःसह अति दुःख किती पतिस जाहलें—
वैराग्यहि मनिं त्याच्या पूर्ण बाणलें
नित्य पत्निसद्गुण मनिं आठवीतसे
सांगे सकलांस ‘ शून्य सकल जग दिसे ’ —४



ग्रंथ संग्रहालय
४२५१

दोन मास पुरतेही जों न लोटले--
थाट गृहीं कैचा त्या, काय चालले
तोच पती नववधुतें माळ घालुनी
आनंदें मिरवत कीं येइ घेउनी —५
हाय ! हाय ! बोल फोल सकल जाहले--
वचन दिलें गतपत्निस, तेंहि भंगलें
गतपत्निप्रेम सकल जाय विसरुनी
नववधुसह संसारीं जाय रंगुनी —६

---

## विषय–विष.

**चालः—चंद्रकांत राजाची........**

बागडतां वनिं गानलकेरी श्रवणिं कुठुनि आली
गान मुग्ध कुणि मृगी सर्व जग विसरुनिया गेली
रमली, भुलली, उभी राहिली, तोंच काय झालें
खरतर शर वेधुनी मृगिस त्या व्याधें कुणि वधिलें ॥ १ ॥
अफाट सागर जललहरीवरि मत्स्य मुदें लोळे
सागरांतरीं निर्भयचित्तें मौजेनें खेळे
मोहविणारे आमिष लावुनि टाकी गळ कोळी
भुले आमिषा मत्स्य, तयानें मृत्यु तया भाळीं ॥ २ ॥
तडागहृदयावरी कमलिनी रूपमदें डोले
स्वैरविहारी मरंदलोलुप मधुकर तीस भुले
मधु मधुरामृत सेवायास्तव मोह–मूढ बनला
कमलिनिच्या करिं एकाएकीं बंदिवान झाला ॥ ३ ॥
प्रशांत ऐशा सायंकाळीं दीप लाविलेला
ज्योती सुंदर पाहुन कोणी पतंग झणिं भुलला
गरगर गिरक्या घाली भवतीं भुलला रूपाला
जातां जवळी हाय हाय परि जीवाला मुकला ॥ ४ ॥
जलकेलीस्तव गज हर्षानें सरोवरीं येई
करिणी बघतां विषयमदानें धुंद पहा होई

विषयप्रेमें जळीं ओंडतां भान त्यास नुरलें
विषयांधाचे एकाएकी बद्ध चरण झाले ॥ ५ ॥
वांटे सुखकर विषय क्षणभर परि विषसम अंतीं
विचारवंता मनुजा सत्वर उमज उमज चित्तीं.

---

[stamp]

## लोकमान्यांचें पुण्यस्मरण.

चाल—उद्धवा सांतवन कर जा....

या महाराष्ट्र भूमींत—' केसरी ' जयें गर्जविला
गंभीर गर्जनें ज्याच्या—थरकांप सुटे शत्रूला
कीर्तिदुंदुभीनें ज्याच्या—स्वर्गही सकल घुमवीला
जन्मजात मम अधिकार
हें स्वराज्य मी घेणार
हीच जया चिंता फार
जो दावी सत्यपथाला—हें वंदन त्या टिळकाला
देशार्थ देह झिजवोनी—लोकमान्य अमुचा गेला
जरि कारागारीं नेलें—तरि धैर्यध्रुव ना ढळला
कर्मयोगि एकच असला—जो उजळि हिंदभूमीला
गाऱ्हाणें हिंदिजनांचें
जें दुःख हिंदभूमींचें
अंतरीं जें सदा डांचे.
तें सांगाया देवाला—जणुं टिळक जाय स्वर्गाला

---

## स्वामी श्रद्धानंदांचें स्वर्गारोहण.

**चालः**—अजि म्यां ब्रह्म........

हाय कैसा पडत घाला
नराधमानें त्या यवनानें—धर्मवीर हा अपुला वधिला ॥ ध्रु ॥
वीरोचित त्या मृत्यू आला
धारातीर्थीं करि शयनाला
धर्मरक्षणीं प्राण वेचिला ॥ १ ॥
हिंदभूमिचें दैन्य न सरलें
सत्पुत्रानें मृत्युसि वरिलें
गंध कीर्तिचा जनिं दरवळला ॥ २ ॥
परवशतेंतिल दुबळी जनता
सूड न घेतां वरी शांतता
कोप न कां ये शांत मनाला ? ॥ ३ ॥
धैर्यशील अति स्वार्थत्यागी
स्वागत त्याचें होइल स्वर्गीं
मिळविल तेथें सन्मानाला ॥ ४ ॥
उठा बंधुनो स्वधर्मकार्या
स्वामी न गेले जगा दावुया
आनंदीत करुं प्रिय मातेला ॥ ५ ॥

काव्य ... ०२४ ता.

## पाळणा.

( कवयित्री आपल्या बंधूंच्या चिरंजिवाच्या बारशास अहमदनगर येथे गेली असतां बारशाचे ऐन गर्दीत प्रस्तुत गाणें रचण्यांत आलें. )

बाळा जो जो रे—मधुसुदना—जो जो राजिववदना

वद्य पंचमिला—जन्मला—बाळ सुमुहूर्ताला
आली ही वार्ता—सौख्याची—होय कृपा देवाची
हर्ष अम्हां झाला—सकलांला—पाहुन पुत्रमुखाला
आज सुवर्णाचा—सौख्याचा—मंगल दिन हा साचा
थोर कुळीं आला—जन्माला—भ्रष्टयोगि हा गमला
भूषण ‘ संत ’कुळा—हो बाळा—सत्कृतिचा धरि चाळा
सुखकर हो सकला—राष्ट्राला—उद्धरि निजदेशाला
दावुनि शिशुलीला—स्नेहाळा—तोषवि जननयनांला
बाळा दीर्घायू—होवोनी—क्रमि दिन आनंदांनीं
आशिर्वाद तुला—हाच अतां—देई तव ही आत्या
बाळा जो जो रे—वसंता—‘ संत ’कुळीं हो सविता

## भाउबीज

### चालः—स्त्रीगीताची

बंधुप्रीति जगतीं श्रेष्ठ सौख्यदायी—आज ही भाउबीज येई ॥ ध्रु०॥
दिवस मोजियेले बध दिपवाळींचे—सुदिनही येवो सौख्याचे
उषःकाल होतां उठवी बंधूला—प्रेमें भगिनि वदे त्याला
उठीं भाउराया । उठ रे लवलाही—आज ही भाउबीज येई— १
सुवासिक तेलें उटणीं वाटियली—बंधुला अभ्यंगाचि घाली
रुचकर पक्वान्नें भोजनासि केली—आग्रहें त्यास वाढियेली
आनंदें बोले बंधुसवें भगिनी—आजही भाउबीज येई— २
प्रेमळ बंधू तूं होसि जसा मजला—होइ तूं तसाच सकलांला
पहा भाउराया काळ कसा फिरला—भगिनिच्या राखी शीलाला
धर्मभगिनिसाठीं तनुमनधन झिजवी—आजही भाउबीज येई— ३
ओवाळणि घाली आज मला ही रे—हृदयीं जागृति ठेवी रे
प्रेमभरें भगिनी बंधुस ओवाळी—जातसे हर्षें दिपवाळी
ओवाळणि घाली इच्छित बंधूही—आजही भाउबीज येई— ४

---

# विनवणी

## वृत्त—भुजंगप्रयात

मनीं माझिया खिन्न आले विचार
तयांचे मुळें चित्त अस्वस्थ फार
असे दृश्य खोटे मनाला कळेही
परी गांठ पक्की प्रपंचीं पडेही ॥ १ ॥

उन्हाळा हिवाळा तसा पावसाळा
अवस्था अशा येथही मानवाला
शिशूलागि बाल्यामधें बाप आई
तया रंजवीता सदा काळ जाई ॥ २ ॥

वसंतांत आंब्यास मोहोर येई
तसा भार ये यौवनाचाच देहीं
पतिप्रेम तारुण्यि कैसें टिकेल
मना लागते घोर चिंता अघोर ॥ ३ ॥

रमे नित्य भोगीं विलासांत नाना
कशाचा मनीं ईश तो आठवेना
तरू जेवि ग्रीष्मांत निस्तेज होई
जरेनें पुढें देह तैसाच होई ॥ ४ ॥

अतां वाटते राम नेत्रें पहावा
परब्रह्म तो सर्वदा आठवावा

प्रभूचा कशानें परी लाभ होई
वळेना मनासारखी जीभ पाही ॥ ५ ॥
प्रपंचांत आशा--सुखाचीच चिंता
म्हणोनी न तें आठवी विश्वनाथा
कळे हें, म्हणोनी तुला शेषशाई ॥ ६ ॥
सदा आळवी लागते नित्य पायीं
प्रपंचीं रमोनी तुला आठवावें
अशी बुद्धि दे, मागणें हेंचि द्यावें
असे मूढ **चिंतामणी--पत्नि** पाही
**नृसिंहा !** करावी कृपा सर्वदाही ॥ ७ ॥

---

## श्रीकृष्णास

चाल—सबसे रामभजन....

प्रभो ! टाकुनी जासी, कसली केलि गुन्हेगारी ? ॥ ध्रु० ॥

मुरलीवादन करी मोहना हीच मना आशा
कुंजविहारी मधुर बासरी खेळवि रे अधरीं— १
वेणुसुधा सेवनांत होई मला खरा हर्ष
भानु लोपला, नलिनी मिटल्या, पडले अंधारीं— २
ओत ओत तव वेणुसुधारस या माझ्या हृदयीं
नंदकिशोरा जगदुद्धारा धांव धांव कंसारी !— ३

---

# मालेची समाधि.

**चाल**–चंद्रकांत राजाची

सोनगांवच्या शिवरावांची सुंदरशी लेक
माला होती पित्यास अपुल्या एकुलती एक
लावण्यानें जणूं चमकते चंद्राची कोर
तसेंच होतें हृदय तियेचें फार फार थोर
पोर गुणाची पाहुन लागे सगळ्यांना वेड
पिता तियेचा पुरवित होता सर्व तिचे कोड
बोल बोलतां वाढूं लागली पोर गौरकाय
तारुण्याच्या सीमेवरती ठेवियला पाय
लग्नाची लागली काळजी तिला पाहुनीया
जात पोरिची आंच लाविते बापाच्या हृदया
वसंत नामें त्याच गांवच्या तरुणाला बघुन
शिवरावानीं त्या दोघांचें ठरवीलें लग्न
वसंत होता गरीब घरचा; सुशील परि होता
स्वभाव प्रेमळ पटला त्याचा मालेच्या ताता
मुहूर्त पाहुन त्यांचें झालें थाटानें लग्न
वाट तयाची पहात होते परी एक विघ्न
पतिच्या सदनीं प्रवेश केला प्रेमें मालेनें
जणूं ठेविला घरीं तयाचा पायच लक्ष्मीनें

एकमेकांवरती होतें प्रेम फार त्यांचें
हात जोडुनी पुढें ठाकले सुख संसाराचें
खडा बोंचता एका, येई दुसऱ्याला पाणी
प्रेमाच्या राज्यांत शोभली ती राजाराणी
प्रीतिरसाची सुधा सेविती दोघे आकंठ
गरिबाच्या झोंपडींत आले उतरुन वैकुंठ
विणीत असतां संसाराचा पट आनंदानें
फाडाया तो कातर धरिली परि दुर्दैवानें १३

*          *          *

त्याच गांवचा पद्माकर या नामें कुणि नीच
यांना बघुनी जळूं लागला तो अपुल्याशींच
मालेवरती दृष्टी होती पूर्वीपासून,
परि वसंताकडे पाहिलें दैवें हांसून
म्हणून त्याला सुंदर माला लाभलीच नाहीं
संतापानें झाली त्याच्या अंगाची लाही
चंचल लक्ष्मी प्रसन्न होती त्या नीचावरती
मोडुन माना गरिबांच्या तो करीतसे भरती
मज धिक्कारून भिकाऱ्यास त्या अर्पियली माला
याचा घेइन सूड, तोडुनी लग्नाची माला

मर्कटाकरीं रत्न दिलें त्या मला हवे असतां
बटीक करुनी ठेविन, राखा याद तुम्ही आतां
वसंतमालेच्या सौख्याला लागुनिया दृष्ट
संसाराच्या दुधांत टाकी मीठ हाय दुष्ट !

*　　　*　　　*

कामासाठीं गेला होता वसंत परगांवीं
येइल कांहीं संकट, नव्हतें हें त्याच्या गांवीं
निशीत होती माला तांदुळ घरीं एकटीच
गरिबीमुळें चाकर माणुस कोणी नव्हतेंच
तिच्यापुढें तों उभा राहिला पद्माकर काळ
भांबावोनी गेली माला, भलति असे वेळ
" पति नसतांना घरिं जावें कां जाणुन परक्यानें "
माला बोले परि त्याच्याशीं कांपत भीतीनें
हां हां करुनी विकट हास्य पद्माकर बोले
" तुलाच भेटायचे माझ्या आज मनिं आलें
तूंच सुंदरी ! हृदयांतिल या प्रेमाचा ठेवा
कसा मिळाला त्याला, न कळे त्याचा कावा
या हंसाचा भाग तूंच गे, तूं माझी हंसी
परि कावळा वसंत त्यानें लांबविलें तुजसी

गरिबीच्या हालांत राहुनी तव कांती गेली
लावण्याची कलिका सखये पार तुझी सुकली !
माले ! घाली माळ बाहुची, वेळ नको लावूं
मोत्यांची माळ घालितो, सुखशय्येवरि जाऊं !"
क्रोधें थरथर कांपे माला शब्द मुळीं येना
बहु कष्टानें मन आवरुनी वदे तीव्र वचना
"नराधमा तूं परस्त्रीवरी दृष्टी ठेवीसी
एकटीच मी आहे म्हणुनी येथें आलासी
परि मूढा तुज माहित नाहीं म्हणुनी फसलासी
प्रेमकवच ते अर्पुन मजसी गेले गांवासी"
त्या दुष्टाला माला इतुकी जरि वदली रागें
नराधमा त्या शुद्ध न राहे लगट करूं लागे
परि न उगमगे धैर्य धरोनी पुनः त्यास बोले
"एक पद तरी टाक पुढें मग प्राण समज गेले
आत्मरक्षणासाठीं जवळीं हत्यार जरि नाहीं
तेज सतीचें अग्नीहुनही अधिक असे पाही
धावुन येतिल माझ्याकरतां देवदूत सगळे
चांडाळा तूं लौकर येथुन कर अपुलें काळें"
नीचानें त्या बाहु पसरिले, मुख जों वर केले
मूर्ति तियेची दिव्य पाहुनी हातपाय गळले,

धैर्य गळोनी चोरासम तो हळुच निघुन जाई ३८
पाठीमार्गें येत कुणी कां म्हणुन वळुन पाही

*　　　　*　　　　*

दुसऱ्या दिवशीं वसंत गांवाहून परत आला
मालेनें वृत्तांत त्याजला सगळा सांगितला
चढल्या भिवया वरतीं, रागें नयन लाल झाले
' नरडी दाबुन त्याचे घेइन आज प्राण ' बोले
मिठी मारुनी हळूंच त्याला मग माला वदली
" क्षमा करावी त्यास विनविते ही दासी अपुली
क्रोधाला नच थारा द्यावा या अपुल्या हृदयीं
होइल भलते, नीच असे तो," लागे ती पायीं
पत्नीच्या ऐकुनी वचाला वसंत नच वदला
सुधेसारख्या गोड मिठीनें राग शांत झाला
परि सर्पाच्या शेपटीवरी पाय जयें दिधला
दंश करुनी डाव साधितो कळे न हें तिजला ४४

*　　　　*　　　　*

सागर अंधाराचा पसरे पृथ्वीच्या पाठीं
जननिद्रेच्या पाशीं पडले विश्रांतीसाठीं
कामाचे जड ओझें वाहुन वसंत थकलेला
उशीर झाला आज तयाला घरीं यावयाला

अंधाराची भीषणता नच भिववी कधिं त्याला
तेवत होती हृदयीं त्याच्या प्रीतीची ज्वाला
जगीं कुणाला कसा कळावा काळाचा हेतू
मनीं तयाच्या तेव्हां नव्हता कसलाही किंतू !
पाठीमागुन चाहुल आली असेल कोणाची
नव्हती दुसऱ्या कोणाची, पण त्याच्या मृत्यूची !
अंधाराच्या पोटीं चमके कसलेसें पातें
कठारे बसला घाव तोंच जों मिटलें नच पातें
रक्तानें न्हालेला पडला वसंत भूवरती
रातकिड्यांचें रडणें चाले साऱ्या दिक्प्रांतीं
पाट वाहुनीया रक्ताचा उरला नच त्राण
" माला माला " करीत त्यानें सोडियला प्राण ॥ ५२ ॥

* * *

रात्र संपली, नाहिं लागला डोळ्याला डोळा
मालेच्या मनिं विचार येतां जीव होइ गोळा
मार्गप्रतीक्षा करीत बसली सती वसंताची
तिकडे लागे ठेंच कुणाला धुक्यामधें त्याची
भिजतां रक्तें पाय तयाचा मनिं तो घाबरला
वार्ता गेली गांवामध्यें, गांव झणीं जमला

माला आली, स्वर्गी गेला नाथ तिचा दिसला
रडुनी रडुनी सुजले डोळे भ्रम तिजला झाला
वार्ता पसरे जिकडे तिकडे अघोर कृत्याची
करूं लागले कुणी तयारी स्मशानयात्रेची
शांतवावया सतिला लोटे गांव अतां सारा
पद्माकरही गेला हर्षुन सांत्वन करण्याला
त्याला बघुनी जळूं लागली माला क्रोधानें
आवरिलें परि चित्त आपुलें तिनें विवेकानें
पतिदेवासह सति जायाचा निश्चय कथि सकलां
श्रेयस्कर तिज मार्ग वाटला स्वर्गी जायाला
तिचें पाहुनी कृत्य भिऊनी पद्माकर गेला
" माते " म्हणुनी तिचिया पाया स्पर्श तयें केला
"व्यर्थ तुला मीं छळिलें भगिनी क्षमा करी आतां
उदार हृदयी तव पति बघुनी विटाळिलें हाता
या पुढती मी परस्त्रियेला माता मानीन
तुझी थोरवी माले देवी ! नित्य आठवीन
करूं नको परि भलतें कांहीं झालें तें विसर
तव दुःखाला कारण जरि मी, सोडी अविचार"
सद्गदीत तो अतिशय झाला शब्द ये न वाचे
गालावरुनी अश्रु वाहती पश्चात्तापाचे

फुलासारखें हृदय द्रवोनी ती लागे बोलूं
" पुन्हा नको तूं सतिच्या हृदयावर घाला घालूं
ऊठ येथुनी आतां मजला विलंब बहु झाला
मार्गप्रतीक्षा करितां होती श्रम बहु नाथाला "
बहुपरि विनवी पद्माकर परि तिनें न ऐकियलें
बळी घेतले नराधमाच्या कामाच्या गरलें ॥ ६८ ॥

*    *    *

सोनगांवच्या सीमेवरती समाधि एक असे.
पश्चात्तापें मनीं पोळला माणुस तेथ बसे
ओढ्यावरचीं फुलें तोडुनी नित्य कण्हेरीची
वाहि समाधिस विझवायाला आग घोर मनिची ॥ ७० ॥

# देशासाठीं.

सायंकाळची वेळ! आकाशाची लांबणीची वाट चालून दमल्यामुळें भगवान् सहस्ररश्मी अस्तगिरीच्या शिखरावर विश्रांति घेण्यासाठीं टेकले होते. चंचलानदीवर अस्ताला जाणाऱ्या सूर्याचा प्रकाश पडून तिची प्रत्येक लाट सोन्याचीच बनली कीं काय असा भास होत होता. चहूंकडे अगदीं शांत होते; अशा वेळीं तारुण्यांत नुकताच प्रवेश केलेली एक सुंदर बालिका चंचलेच्या पाण्याकडे शांत नजरेनें पहात वाळूमधें बसली होती. तिचा काळाभोर केशकलाप पाठीवर स्वैर संचार करीत होता. जसजसे सूर्याचे किरण डोंगरामागें ओढलें जाऊन चंद्राचा फिकट प्रकाश चंचलेच्या पाण्यावर चकमकूं लागला तसतशी त्या बालिकेच्या मुखावर चिंतेची फिकट छाया दिसूं लागली. ती आपल्याशींच बोलूं लागली,

"कुमार अजून कां बरं येत नाहींत? माझ्यासारख्या गरिबांच्या मुलीवर युवराज कुमारसिंहाचं खरोखरच प्रेम असेल कां? पण त्यांनीं माझ्यावर कां प्रेम करावं? ते राजपुत्र व मी एक गरीब पण निष्कपट व निर्मल प्रेम करणारी कुमारिका! त्यांना माझ्याकडून निर्व्याज प्रेमाखेरीज कांहिंही मिळणार नाहीं; किंवा विषयी पुरुषाच्या स्वाभाविक मनोधर्माप्रमाणें ते मला फसवीत तर नसतील ना? मग मला आज निरोप पाठवून मुद्दाम बोलाऊन घेऊनही ते कां बरं आले नाहात? किंवा ते इकडे येण्याचें विसरूनच गेलें?" ती इतकें बोलत

आहे तोंच " या जन्मीं तरी कुमार तुला विसरणार नाही " असे गोड शब्द तिच्या कानावर आले. मागें वळून पहाते तोंच ती ज्याची मार्ग-प्रतिक्षा करीत होती तोंच कुमारसिंह तिला दिसला.

कुमार म्हणाला, " तुला माझ्याकरतां फार वेळ तिष्ठत बसावें लागले ना ? पण गुलाब, मी तरी काय करूं ? पिताजींचा डोळा चुकवून यावें लागले म्हणून इतका विलंब झाला. गुलाब, तुला फार वेळ एकटीला बसावें लागलें म्हणून राग तर नाहीं ना आला ? "

" कुमार, माझ्या रागाचें एक राहुं द्या, पण मी म्हणते आजच महाराजांचा डोळा चुकवून येण्याचें काय कारण ? आपण तर नेहमीं इथं येतां मग आजच एवढी बंदी कां ? " एक लांब सुस्कारा टाकून गुलाब म्हणाली.

" गुलाब, काय सांगूं ! आज पिताजींना कोणी दुष्टानें जाऊन सांगितलें कीं कुमार कोणा एका तरुणीबरोबर दोन दोन तास बोलत बसतो व त्याचें तिच्यावर फार प्रेम आहे. हें कळल्यावर पिताजी खवळले व मला बोलावून घेतल्यावर " तुझ्यासारख्या शूर राजपुत्रानें एका सामान्य घराण्यांतील मुलीवर प्रेम करावें हें तुला शोभत नाहीं, इतकेंच नव्हे तर यापुढें तूं तिची केव्हांहि भेट घेतां कामा नये असें त्यांनीं मला रागानें बजावलें म्हणून आज एवढी भेटायची चोरी ! " त्यांना माझ्या गुलाबसारख्या रत्नाची काय पारख ? " दीर्घ सुस्कारा

टाकून त्यानें तिच्याकडे पाहिलें तों तिच्या डोळ्यांतून अश्रू टिपकले. तोंच कासावीस झालेला कुमारसिंह म्हणाला.

'हें काय बरं गुलाब, तुला इतकं वाईट वाटेल अशी माझी कल्पना नव्हती, असती तर तुला मी सांगितलंच नसतं."

त्या शूर राजपुत्राला तिच्या कोमल हृदयाची काय कल्पना! त्याचें हें भोळें प्रेम पाहून तिलाही बरें वाटलें. ती म्हणाली,

"महाराज बोलल्याचं मला मुळींच वाईट वाटत नाहीं, पण आपलं प्रेम तरी........

बोलतां बोलतां तिचा गळा दाटून आला.

युवराज तिचा हात आपल्या हातांत घेऊन म्हणाला,

"गुलाब, माझ्या प्राणा! तुला माझ्या प्रेमाविषयीं संशय येतो, ना? ही पवित्र चंचला नदी, हा शुभ्र चंद्रमा, हे त्याच्या भोंवती चमचमणारे तारे, हे आपल्या स्थानापासून कधींहि न ढळणारे पर्वत, व हे उदार वृक्ष, या सर्वांना साक्ष ठेवून मी सांगतों कीं तुझ्या शिवाय सर्व स्त्रिया मला मातेसमान आहेत."

"कुमार, कुमार! काय ही भलतीच प्रतिज्ञा! ह्याबद्दल तुम्हाला पुढें खचित पश्चात्ताप होईल. अजून तरी तुम्ही आपले शब्द परत घ्या."

"या जन्मीं तरी पश्चात्तापाचं नांव नको" कुमार म्हणाला "बरं पण आतां मी जातों, कदाचित् पिताजींना कळलं तर ते उगीच अधिक खवळतील; हो पण, तुला एक महत्त्वाची गोष्ट सांगायची

होती, पण ती आज नको. वेळ होईल, उद्यां याच वेळेला आपण इथें भेटूं, तेव्हां सांगेन, मला आतां गेलंच पाहिजे" असें म्हणून त्यानें घोड्याला टांच मारली.

तो दिसेनासा होतांच गुलाब कुंवरही जड पावलें टाकीत निघून गेली.

× × × ×

मेवाडमधल्या एका छोट्या संस्थानचा राणा अजपालसिंह हा अतीशय शूर व तेजस्वी राजा होता. त्याचा पुत्र कुमारसिंह हाही बापाप्रमाणें शूर व देखणा राजपुत्र होता. मुसलमानांच्या कारकीर्दींत त्यांना शरण न गेलेलें व त्यांच्या स्वाधीन न झालेलें असें हें एवढें एकच संस्थान राहिलें होतें. वृद्ध अजपालसिंहाला आपल्या मुलाबद्दल फार अभिमान होता, म्हणूनच त्याला तुझा मुलगा एका गरीबाच्या मुलीच्या नादीं लागला आहे असें मंत्र्यानें सांगितल्याबरोबर अतिशय संताप आला व त्यानें मुलाला बोलावून काय सांगितलें तें आपल्याला कळलेंच आहे.

गुलाबकुंवरचा बाप वीरसिंह हा त्या संस्थानांतला एक सुखवस्तू गृहस्थ होता. पण तो लवकरच वारल्यानें त्याचा मुलगा अमरसिंह व मुलगी गुलाब कुंवर यांना फारच वाईट दिवस आले. आपल्या कथानकाच्या वेळीं ते बहीणभाऊ अगदींच कंगाल स्थितींत आपले दिवस कंठीत होते.

गुलाबच्या अंगांत तिच्या बापाचे बहुतेक गूण उतरले होते. त्यांतला मुख्य गुण म्हणजे देशाबद्दल निष्ठा. ती जशी शूर होती

त्याचप्रमाणें रूपानें व गुणानेंही त्या काळांत तिच्या जोडीची कोणी नव्हती.

एकदां कुमार शिकारीला गेला असतांना रानांत एका हरिणाबरोबर स्वच्छंदानें खेळत असलेली गुलाब त्याच्या दृष्टीस पडली. तेव्हांपासून त्या दोघांची ओळख झाली. कुमार तिच्या सौंदर्यानें व शौर्यानें अगदीं मुग्ध झाला व त्यानें तिच्याशींच लग्न करण्याचा निश्चय केला.

× × ×

दुसऱ्या दिवशीं तीच सायंकाळची वेळ! व चंचलानदीचें तेंच वाळवंट! प्रेमीजनांना भेटायला तें स्थान फारच योग्य होतें. गर्द झाडींतून वाहात येणारा गार वारा व चंचलानदीचें झुळझुळ चाललेलें अखंड गायन हीं प्रेमी माणसांच्या मनाचें औत्सुक्य वाढवायला हटकून तयार असायचीं.

आजही गुलाब कुमारची वाट पाहात होती. तिनें आज अगदीं पांढरें शुभ्र पातळ परिधान केलें होतें, पण त्याच साध्या पातळानें तिच्या सौंदर्याला अप्रतीम शोभा आली होती. तिच्या अंगावर एकही सोन्याचा अलंकार नव्हता पण तिच्या सद्गुणाचा व पावित्र्याचा अलंकार इतका मोहक होता कीं, कुणाही मनुष्याला त्या देवतेकडे पापी नजरेनें पाहण्याचें धाडस झालें नसतें.

थोड्याच वेळांत घोड्याच्या टापांचा आवाज ऐकूं येऊं लागला. कुमाराची मोहक मूर्ति दिसतांच गुलाबनें त्याच्याकडे अत्यंत गोड

हास्य करून पाहिलें, परंतु हाय ! उत्तरादाखल त्याच्या सुंदर चेहऱ्यावर नेहमीं दिसणारी प्रसन्न हास्यांची छटाही तिला आज दिसली नाहीं !

अस्वस्थ चित्तानें दोघेही वाळूवर बसले.

" आज आपण मला कोणची महत्त्वाची गोष्ट सांगणार आहांत "? हे मधुर शब्द हलक्या आवाजांत गुलाब बोलली.

" अग, पण मला बसूं तर देशील, इतकी घाई कां ? "

" किनई माझं मन अगदीं उत्सुक झालं आहे "

" बरं तर ऐक. पण अगोदर काल काय झालं तें सांगतों; काल मला परत जायला बरीच रात्र झाली, पिताजींनीं माझी चौकशी केली ! मी उशिरां आल्याचं कळतांच ते फार रागावले व म्हणाले, " तुला जर माझं ऐकायचं नाहीं तर यापुढें तूं माझ्या घरांत राहूं नकोस, तुला वाटेल तिकडे निघून जा. "

कुमाराचें बोलणें ऐकून गुलाबला फार वाईट वाटलें व ती म्हणाली " कुमार, तुम्हांला माझ्याकरतां किती अपमान सोसावा लागला " जरा वेळ थांबून ती म्हणाली.

" बरं पण आपण कोणची महत्त्वाची गोष्ट सांगणार होता ? "

" मला असं कळलय् कीं, दिल्लीपति औरंगजेब आपला सरदार तकरीबखान यास पांच हजार जय्यत सैन्यासह मेवाडवर स्वारी करण्यास धाडणार आहे. तुला माहीत आहे कीं, मेवाडांतील सरदारांची

लढाईमध्यें माझ्यावर भिस्त आहे, पण मी असं ठरवलं कीं पिताजींना जर माझं तुझ्याकडे येणं खपत नाहीं तर मी तरी त्यांच्यासाठीं जिवा-वर उदार होऊन कां लढावं ? गुलाब, तूं आणि मी दोघेंजण एक-दोन दिवसांत कोठें तरी लांब निघून जाऊं. माझ्या बाहुबलानें आप-ल्याला कोठेंही कमी पडणार नाहीं; तर मग माझा बेत तुला पसंत आहे का ?"

गुलाब आश्चर्यानें म्हणाली,

"काय ! आज मी काय ऐकतें आहें हें ! ज्यानं प्रतापसिंहाच्या कुळांत जन्म घेतला व ज्याचें आजपर्यंत आपल्या प्रजेवर प्राणापेक्षांही जास्त प्रेम त्या कुमारसिंहाच्याच तोंडचे का हे शब्द ? कुमार ! तुम्हीच बोललांत कां हें ? नाहीं, शूर अजपालसिंहाच्या मुलाच्या तोंडून असे उद्गार केव्हांही निघणार नाहींत. खास माझ्या ऐकण्यां-तच कांहीं तरी चूक झाली. ज्याचं आपल्या देशावर अती उत्कट प्रेम होतं, ते कुमार एकानिस्वार्थी प्रेम करणाऱ्या गरीब कुमारिकेसाठीं मायभूमीला संकटाच्या तोंडांत देतील काय ? नाहीं, माझ्या हृदयां-तल्या सिंहासनावर बसलेले कुमारसिंह असला हीन देशद्रोहाचा विचार मनांत आणण्याससुद्धां केव्हांही तयार होणार नाहींत. खरो-खर आपण माझी परीक्षाच पहात आहांत. माझं प्रेम आपल्यावर जास्त कीं, देशावर जास्त हें पाहण्याकरितांच तुम्ही असें बोललांत; कुमार, अजूनही तुम्हांला माझी थट्टा करणें पुरे असें वाटत नाहीं कां ?"

गुलाबचे हे उद्गार ऐकून कुमारला आपल्या वर्तनाची लाज वाटूं लागली. तो मान खालीं घालून म्हणाला, " गुलाब, एकच क्षण कां होईना पण तुझ्या सौंदर्याला भुलून मी आज केवढें पातक करणार होतों ! तूं माझें त्या भयंकर पापापासून रक्षण केलेंस. गुलाब, तूं कोणी तरी शापभ्रष्ट देवता आहेस. धन्य आहे तुझी ! किती थोर आहे तुझें अंतःकरण ! ज्याचें मन क्षणोक्षणीं बदलतें व अंतःकरण अनुदार व कोत्या कल्पनेनें भरलें आहे असा हा कुमार तुझ्यासारख्या देवतेला मुळींच योग्य नाहीं. खरोखरच तुझी योग्यता एखाद्या देवतेहूनही जास्त आहे. आज तूं माझी देशद्रोहासारख्या भयंकर पापापासून मुक्तता केलीस. तुझे हे उपकार या जन्मीं तरी फिटतील काय ?"

" छे, छे, कुमार, मी यांत जास्त कांहींच केलें नाहीं, व जर अगदीं मनापासून आपल्याला माझे उपकार फिटावे अशी इच्छा असेल तर कुमार यापुढें या अभागी गुलाबला विसरून जा; आणि माझ्यावर असलेलें सगळें प्रेम देशावर करा. तुमच्यासारख्या शूर तरुणांची आपल्या देशाला अतिशय जरूर आहे. कुमार, माझी ही एवढी शेवटचीच कां म्हणानांत, विनंती मान्य करा. तुमचें माझ्यावर खरें प्रेम असेल तर ह्यापुढें मला विसरून जा. "

तिचा कंठ भरून आला; तिला यापुढें जास्त बोलवेना.

तिचें हें बोलणें ऐकून कुमाराचें मन गहिंवरलें पण आत्मसंयमन करून तो म्हणाला,

" गुलाब, असं काय बरं ! तुला विसरणें तर मला मुळींच शक्य नाहीं, पण एवढें सांगतों कीं मी यापुढें देशकार्यार्थ हा देह झिजवीन, वेळीं प्राणसुद्धां देईन. एवढं हें देशावरचं अरिष्ट संपलं कीं पिताजींचं मन वळवीन व तुझ्याशींच लग्न करीन. बरं पण मी आतां जाऊं का? बराच उशीर झाला; येतांना देशद्रोही असलेला हा कुमार आतां जातांना मायभूमीचा एकनिष्ठ सेवक होऊन जात आहे आणि तो केवळ तुझ्यामुळेंच ! गुलाब, जाऊं ना आतां ? "

" कुमार, जा, याच क्षणीं जा व त्याबरोबरच या अभागिनिलाही विसरून जा. एखाद्या सुंदर राजकन्येशीं विवाह करून सुखी व्हा. कुमार, माझ्या शेवटच्या विनंतीचा अव्हेर करूं नका. "

पण कुमार घोड्यावर बसण्याच्या गडबडींत असल्यामुळें त्याला तिचे शेवटचे शब्द नीटसे ऐकूं गेले नाहींत. कुमार दृष्टिआड होई-पर्यंत गुलाब त्याच्याकडे अनिमिष नेत्रांनीं पहात होती. तिनें एक दीर्घ निश्वास टाकला व उद्गारली, "कुमार तुमची ही मनमोहक मूर्ति आतां स्वर्गांतच पहायला मिळेल.

× × × ×

मध्यरात्रीची वेळ ! चंचलेचें पाणी शांतपणें वाहात होतें, तिच्या पात्राच्या शीतळ शय्येवर वाऱ्याला झोंप आली होती. चंद्राची वाकडी कोर ढगामागें दडून आपले चोरटे किरण वसुधेच्या पाठीवर फेंकीत होती. चहुंकडे अगदीं शुक होतें. पण रातकिड्यांची कुरकुर मात्र

कानाला जाणवत होती. अशा वेळीं चंचलेच्या कांठावर शुभ्रवस्त्रांकित गुलाबकुंवरची मूर्ति हात जोडून बोलूं लागली,

"हे पवित्र माते, मला तुझ्या उदरांत जागा देशील काय? कुमार सध्यां आपल्या हीन कृत्यापासून परावृत्त झाले आहेत खरे, पण तेच पूर्वींचे विचार त्यांच्या मनांत पुन्हां आले तर! देवा, या अभागिनीचा जन्म दुसऱ्याला दु:ख देण्याकरितांच झाला आहे काय? कुमार, माझं तुमच्यावर खरं निस्वार्थी प्रेम होतं पण मी काय करूं? माझ्यामुळें तुमचं मन देशसेवेपासून परावृत्त होऊं लागलं म्हणून मला आज हा मार्ग स्वीकारावा लागत आहे. मी या जगामधून कायमची नाहींशी झाल्याशिवाय तुमचं मन नीटपणें स्वदेशाकडे लागणार नाहीं. चंचले, तूं मला दूर लोटणार नाहींस ना? स्वर्गांत बाबा नी आई माझी वाट पहात असतील. आपल्या मुलीनें देश-कार्याचे आड प्रेम येते म्हणूनच देहत्याग केला असें समजल्यावर त्यांना तेथें स्वर्गांत आनंद होईल व मी तिथं गेल्यावर ते मला प्रेमा-स्वानीं न्हाऊं घालतील. देवा, कुमारांना दीर्घायुष्य दे, व दादाला सुखी ठेव. कुमार येत्यें मी आतां; आपणांस जें सुख इथं भोगावयास मिळालें नाहीं तें आपण स्वर्गांत भोगूं व तिथं आनंदानें चिर-काल राहूं."

थप्कन् पाणी वाजलें व पवित्र चंचलेनें आपल्या देशभक्त कन्येला हृदयाशीं घट्ट धरलें.

देशासाठीं. ]

थोड्याच काळांत सर्वत्र शांत झालें !

*     *     *     *

कुमारसिंहाच्या शौर्यानें मेवाडवरचें अरिष्ट टळलें. प्रजा सुखांत नांदू लागली पण गुलाबच्या श्वासोच्छ्वासानें पुनीत झालेल्या चंचलेच्या वाळवंटांत कुमार रोज येऊन चंचलेच्या पाण्याकडे पहात बसतो.

कुमारा ! चंचलेच्या जललहरींत तुला गुलाबकुंवरचें सुंदर मुख-कमल दिसतें कां ? कुमारा ! हतभागी कुमारा ! ! तुझ्या मनांत जर त्या वेळीं देशद्रोही विचार आले नसते तर तूं आज गुलाबबरोबर आनंदाच्या शिखरावर विराजमान झाला असतास.

पण—! भवितव्यता बलवती हेंच खरें.

---

८२५७

## केवळ संशय!

आकाशाचा नीलवर्ण गोषा झुगारून उषा सुंदरी सलज्ज हसत आकाशगंगेच्या कांठीं उभी राहिली होती. तारकांचा आकाशभर चाललेला विहार पाहून त्या नव-बालेला आश्चर्य वाटत होतें. बिचारा तारानाथ जसजसा क्षीणबल होत चालला तसतशा क्षणोक्षणीं स्वरूप पालटणाऱ्या तारका त्याचा त्याग करून गगनमंडपांतून निघून जाऊं लागल्या. आतांपर्यंत स्वच्छंदानें विहार करण्यास त्यांना परवानगी दिली म्हणूनच त्या अशा बेताल होऊन आपणांपासून परवानगी न मागतां आपला त्याग करीत आहेत अशी तारकापतीची खात्री होऊन तो अत्यंत म्लानवदन झाला. हें दृश्य पाहून उषासुंदरीला वाईट वाटलें. गोषाच्या प्रतिबंधक पडद्याआड ठेविल्याशिवाय स्त्रियांच्या सद्गुणांचें व शीलाचें संरक्षण होणार नाहीं काय ? जेथें गोषाचा प्रतिबंध नाहीं तेथें अनीतीचा लागलीच प्रवेश होतो काय? अशा प्रश्नानें सद्वर्तनी उषा गोंधळून गेली, पण बिचारीला ठाऊक नव्हतें कीं गोषास स्पर्शही न करतां सर्वदा अंशुमालीबरोबर विहार करणारी प्रभा आपल्या सदैव तापलेल्या पतीशीं किती इमानानें वागते ! हें माहीत नसल्यामुळें उषेचें सुंदर मुख गंभीर दिसूं लागलें होतें.

अशा वेळीं स्वर्गीय उषेलाही आपल्या सौंदर्यानें दिपविणारी एक मानवी उषा खिडकींत उभी होती. ती जरी इतकी सुंदर होती तरी तिच्या चर्येवर चिंतेची छाया दृग्गोचर होत होती. तिनें नुकत्याच

उदयास येणाऱ्या भगवान् सहस्ररश्मीस अत्यंत भक्तीनें नमस्कार केला व ती म्हणाली, " हे सर्व जगास प्रकाशविणाऱ्या नारायणा ! तूं उदयास येऊन रात्रभर निद्रासुख अनुभवलेल्या सर्व जनांस जणूं काय सांगत आहेस कीं आतां उठा व आपल्या उद्योगाला लागा; व सर्व जनही तुझा हा उपदेश अत्यंत प्रसन्नचित्तानें श्रवण करून त्याप्रमाणें वागताहेत; पण भगवान्, माझ्यासारखीनें जिच्यावर निद्रेनें अवकृपा केली आहे अशा स्त्रीनें तुझ्या आगमनानें कां बरें प्रसन्न व्हावें ? मला रात्र व दिवस यांमधील भेदही कळेनासा झाला आहे. रात्रंदिवस माझें आयुष्य कशा तऱ्हेनें नाहींसें होईल हाच विचार मनांत घोळत असतो. ज्या स्त्रीवर पतीचें प्रेम नाहीं तिनें आपले दिवस कसे घालवावे म्हणजे सुख होईल ! कारण जगांत पति हेंच स्त्रीचें दैवत आहे. पतिसुख हेंच पतिव्रतेचें खरें स्वर्गीय सुख आहे. आजपर्यंत ज्या पतिव्रता होऊन गेल्या त्या याच श्रेष्ठ धर्माला अनुसरून वागत आल्या, मात्र अशा साध्वी स्त्रीच्या पतीनें एकपत्नीव्रत कडकडीतपणें पाळलें पाहिजे. आपल्या पतीचें आपल्यावर प्रेम असावें असें प्रत्येक स्त्रीला वाटतेंच; अशा प्रकारचें पतिसुख जन्मोजन्मीं लाभावें हाच आशीर्वाद, हाच वर कोणतीही साध्वी परमेश्वराजवळ नेहमीं मागत असते. त्या सुखांत किंचितही विरोध आलेला तिला खपत नाहीं. प्रेमभंगानें उत्पन्न होणाऱ्या दुःसह यातना सोसण्यापेक्षां हजार वाटांनीं मरण बरें असें तिला वाटतें. जो पुरुष सर्वस्वी आपला असें मानतों,

ज्याच्यावर आपण अकृत्रिम प्रेम करतों, ज्याला जीव कीं प्राण समजतों त्याचें प्रेम जर दुसरीवर असेल तर तिला किती यातना सोसाव्या लागतात; याची पुरुषांना काय कल्पना! त्या यातनांची आंच मला थोडी थोडी लागूं लागली आहे. अजूनपर्यंत तिकडच्यासंबंधीं तशी बातमी माझ्या कानावर आली नाहीं हें खरें, पण आतांशा तीन तीन दिवस घरीं सुद्धां येणें होत नाहीं मग माझ्या जिवाला कसें सुख होईल बरें ? जर जगांत पैशानेंच सुख मिळत असेल तर मला सुखी समजायला कांहीं हरकत नाहीं; पण मनाला सौख्यसमाधान असल्या-शिवाय सर्व गोष्टी तुच्छ आहेत. घरीं आलें म्हणजे म्हणायचें होतें कीं, मी वनस्पतीपासून निरनिराळे रंग तयार करतों; आणि हेंही खरेंच कीं अलीकडे प्रत्येकजण त्यांची फार स्तुति करतो; पण रंग तयार करायला रात्रीं सुद्धां तिकडेंच कशाला राहयला पाहिजे ? रंग करतांना तीन तीन दिवसांतून एकदां सुद्धां का माझी आठवण होऊं नये ? माझा जीव जसा तिकडच्याकरितां तुटतो तसें त्यांना कांहींच वाटत नाहीं कां ? हे देवा, मला सुखी होण्याचा मार्ग दाखव."

असें म्हणून तिनें सूर्याला पुन्हां नमस्कार केला. या वेळेला तिच्या डोळ्यांतून सारख्या अश्रुधारा चालल्या होत्या, इतक्यांत एका दासीनें येऊन सांगितलें कीं, "चहा केव्हांचा आणला आहे, तो निवून चालला आहे तर आपण चलावें." हें ऐकून कुमुदिनीनें ( वाचकहो

हें त्या तरुणीचें नांव ) चटकन् डोळे पुसले व ती जड पावलें टाकीत दासीच्या मागून चालूं लागली.

× × × ×

आंबेगांव म्हणजे अगदीं मोठें गांव जरी नसलें तरी अगदींच लहान खेडेंही नव्हतें, व तेथें शेतकऱ्यांची वस्ती जरी पुष्कळ होती तरी पांढरपेशे लोकही थोडे नव्हते. गांवांतलीं घरें व गांवाची रचना ओबडधोबड नसून व्यवस्थित होती.

गांवचे जहागिरदार माधवराव यांचा आधुनिक पद्धतीचा टुमदार बंगला गांवाबाहेर असून, बंगल्याच्या मागचें एक वावर सोडून एक लांबच लांब अंबराई पसरली होती. बंगल्याच्या आवारांत माधवरावांनीं हौसेनें निरनिराळ्या रंगांचीं फुलझाडें लाविलीं होतीं.

दोन तीन वर्षांपूर्वीच माधवरावांचें लग्न लावून देऊन त्यांचे वडील व मातोश्री स्वर्गवासी झाली होती. कुमुदिनी, माधवरावांना अगदीं पाहिजे होती तशीच बायको मिळाली होती. दोघांचेंही एक-मेकांवर निःस्सीम प्रेम होतें.

माधवरावांना शास्त्रीय विषयाचा नाद फार असून कॉलेजमध्येंही त्यांनीं तोच विषय घेतला होता. अलिकडे ते वनस्पतीपासून पक्के रंग तयार करण्याच्या खटपटींत होते, व त्यांत त्यांना थोडेंसें यशही आलें होतें. आंबेगांवपासून जवळच असलेल्या शहरगांवीं त्यांची प्रयोगशाळा होती. या रंगांच्या गडबडीमुळें त्यांचा बराचसा वेळ

प्रयोगशाळेंतच जात असे. त्यांचा स्वभाव चांगला होता हें खरें, पण त्यांत एक दोष होता, तो हा कीं ते जरा नादिष्ट व संशयी असत. कोणचीही गोष्ट मनांत आली कीं ती पुरी होईपर्यंत त्यांना चैन पडत नसे. त्यांच्या ह्या स्वभावामुळें व या रंगांच्या नादांत त्यांचे दिवसचे दिवस, क्वचित् रात्रही खर्ची पडत असल्यामुळें कुमुदिनीच्या सहवासांत त्यांचा पूर्वीइतका वेळ जात नव्हता. कुमुदिनीकडे ते मुद्दाम दुर्लक्ष करीत असत असें नाहीं, पण नादिष्ट दुसरें काय ?

*　　　*　　　*

सकाळीं आठांचा सुमार असेल. कुमुदिनी आपल्या खोलींतील कोंचावर स्वत:संबंधीं विचार करण्यांत गढून गेली होती. मागें दोन तीन महिन्यांपूर्वी पाहाणारानें जर आतां तिला पाहिलें असतें तर तो तिला ओळखूं शकला नसता इतकी ती खराब झाली होती. तिच्या चेहऱ्यावर उल्हासाचें एकही चिन्ह दिसत नव्हतें. डोळे तर रडून रडून इतके लाल झाले होते कीं नुसत्या रडण्यानेंच ती लाली आली नसून त्यांत जाग्रणाचीही भर पडली असली पाहिजे असें अनुमान काढायला कांहींच हरकत नव्हती. ती आपल्या विचारांत इतकी तन्मय झाली होती कीं बागेची व्यवस्था ठेवणारा वृद्ध माळी किती तरी वेळ तेथें येऊन उभा राहिला होता हें तिच्या लक्षांतही आलें नाहीं. शेवटीं कंटाळून जाऊन तो म्हणाला,

बाईसाहेब, ही मोगऱ्याची वेणी आणली आहे, कुठं ठेवूं ?

यावर ' टेबलावर ठेव ' म्हणून कुमुदिनीनें बोटानें दाखविलेल्या टेबलावर वेणी ठेवून माळी निघून गेला.

त्या सुंदर वेणीकडे पाहून तिला मागील किती तरी सुखद गोष्टींचें स्मरण झालें व त्यापुळें तिला अधिकच वाईट वाटलें. सर्व खोलीभर त्या फुलांचा सुगंध दरवळला होता. ती हलकेंच उठली व तिनें ती वेणी हातांत घेतली व म्हणाली,

" वा पुष्पांनो, मीं तुम्हांला वाढविलें तें माझ्या नेत्रांना सुख व्हावें म्हणून ना? मग आज तर तुम्ही माझ्या मनास दुःख देण्यास कारण होत आहां, तुम्हांला इतकीही अक्कल असूं नये काय कीं, जर आपल्या धनिणीचें मन उल्हासहीन आहे तर आपण तरी कां फुलावें? पण तुम्हांला एवढें कोठून कळणार? ज्या वेळेला माझें मन तुमच्या-सारखेंच आनंदी व उल्हासित होतें तेव्हां तुमच्यापासून मला फार सुख मिळत होतें. जा! ज्या तुम्हांला आपल्या मालकिणीची, जिनें तुम्हांला स्वतः पाणी घालून वाढविलें, तिच्या मनाची जर कल्पना नाहीं त्या तुमच्या सारख्या कृतघ्न फुलांना मी जवळ ठेवूं इच्छित नाहीं. " असें म्हणून तिनें ती वेणी खिडकींतून खालीं फेंकून दिली व तिच्याकडे पाहात किती तरी वेळ उभी राहिली. शेवटीं कंटाळून जाऊन ती मागें वळली तों तिच्या दृष्टीस मधुकर पडला. मधुकर हा माधवरावांचा जिव्हाळ्याचा स्नेही होता. अलीकडे तो बरेच दिवसां-पासून गांवाला गेला होता म्हणून बरेच दिवस त्यांच्या घरीं त्याचें

येणें झालें नव्हतें. इतक्या दिवसांनीं प्रथमच येऊन त्यानें कुमुदिनीला अश्रू ढाळतांना पाहिलें. त्याला अत्यंत वाईट वाटलें, कारण त्याचें तिच्यावर बहिणीसारखें प्रेम होतें.

" वहिनी, माधव कुठें गेला ? दिसत नाहीं इथें, मी मध्यंतरीं गांवाला गेल्यापासून मला इकडील कांहींच हकिगत कळली नाहीं. अलीकडे ज्याच्या त्याच्या तोंडीं त्याची स्तुति ऐकूं येते. पक्के रंग तयार करण्यांत त्याला चांगलेंच यश आलें म्हणे. मला एकदां त्याला भरपूर शाबासकी द्यायची होती. घरीं नाहीं का आला तो अजून ? "

यावर कुमुदिनी काय उत्तर देणार ! तिचें मन जरी खिन्न होतें तरी या वेळेला तिला बरें वाटलें. पतीची स्तुति ऐकून कोणच्या आर्यस्त्रीला आनंद वाटणार नाहीं ! मग कुमुदिनीचें तर माधवरावांवर प्राणापलीकडे प्रेम होतें. ती म्हणाली,

" आतांशा त्या रंगाचा नाद लागल्यापासून त्यांचा बहुतेक वेळ त्या प्रयोगालयांतच जातो. तीन तीन दिवस घरीं येणं होत नाहीं. मग ते आपणांस केव्हां भेटतील हें मी कसं सांगूं बरं ?

बोलतांना तिचा आवाज कांपत होता व डोळे भरून आले होते. तें पाहून मधुकराला फार वाईट वाटलें.

" वहिनी, हें काय ? माधव इतका एककली झाला काय ? मी आतांच तिकडे जातों व त्याची चांगली कान उघाडणी करतों. तुम्ही

तर फारच खराब झालेल्या दिसतां. बरं मी आतां जातों व त्याला घरीं धाडून देतों."

असें म्हणून मधुकर गेला.

मधुकर प्रयोगशाळेकडे चालला असतांना त्याच्या मनांत विचारांचा हलकल्लोळ उडाला होता. प्रथमतः त्याचें व कुमुदिनीचें लग्नाचें घाटत होतें पण आपल्या मित्राचें तिच्यावर प्रेम आहे व तिचेंही त्याच्यावर प्रेम आहे हें पाहून त्यानें आपल्या प्रेमाचा स्वार्थत्याग करून त्यांचा विवाह जुळवून आणला, व आपण स्वतः अविवाहित राहाण्याचा निश्चय केला. हें सर्व माधवरावांना माहीत होतें व म्हणूनच त्याचेंही आपल्या स्वार्थत्यागी मित्रावर फार प्रेम होतें. माधवरावांना आप्तेष्ट वगैरे कोणीच राहिले नसल्यानें, त्यांना आप्त, मित्र वेळीं सल्ला देणारा, सर्व कांहीं मधुकरच होता. तो आपलें ऐकेल अशी मधुकराची खात्री असल्यामुळें त्यानें माधवला घरीं धाडून देतों असें निश्चितपणें कुमुदिनीला सांगितलें होतें. कुमुदिनीलाही खात्री वाटली व ती आपल्या पतीची आतुर मनानें वाट पहात बसली.

× × × ×

दुपारीं दोनचा सुमार झाला होता. मधुकर आश्वासन देऊन गेल्यापासून कुमुदिनी सारखी वाट पहात होती, परंतु अजूनही माधव आला नव्हता. त्याचें असें झालें होतें कीं मधुकर, माधव असलेल्या गांवीं जावयास निघाला होता पण कांहीं निकडीच्या कामामुळें त्याचें

ताबडतोब जाणें झालें नाहीं. तें काम संपल्यावर तो संध्याकाळच्या सुमाराला जायला निघणार होता. परंतु मधेंच दुपारीं त्याला कळलें कीं माधव त्या गांवाहून यायला निघाला आहे. हें कळल्याबरोबर तें सांगायला म्हणून मधुकर बंगल्यांत गेला व माधव येतो आहे अशी कुमुदिनीला वर्दी देऊन कामाच्या घाईमुळें लागलीच परतला; पण तो दारांत यायला व माधवाची मोटार फाटकांतून आंत शिरायला एकच गांठ पडली. मधुकर घाईनें आल्यामुळें त्याचा चेहेरा घामानें डबडबलेला व कांहींसा विचलीत असा झाला होता. हें पाहून संशयी माधवला कसेंसेंच वाटलें. एकतर बरेच दिवस त्यांची गांठ पडली नव्हती आणि आतां जी पडली ती अशा स्थितींत ! तो म्हणाला,

"मधुकर, अरे तूं आलास कधीं ? अगणि असा इतक्या घाईत कां?"

तूं येतो आहेस हें वहिनीला सांगायला आलों होतों. बरं मीं आतां जातों, मला फार काम आहे."

इतकें बोलून तो निघून गेला. त्याच्या या उत्तरानें माधवचा संशय अधिकच दुणावला. वर गेल्यावर कुमुदिनीच्या पवित्र मूर्तीकडे पाहून त्याच्या मनांतलें किल्मिष थोडें कमी झालें. तो म्हणाला,

" कुमुद, अशी उभी कां ? बैस, आज तूं फारच उदास दिसतेस. मला आतांशा कामामुळें घरीं यायला बिलकूल फावत नाहीं. " थोडा वेळ थांबून तो म्हणाला,

" मी परवां डॉक्टरला तुझी प्रकृति पाहून जायला सांगितलं होतं. आले होते कां ते ? "

" हो आले होते. "

एवढेंच उत्तर देऊन कुमुदिनी स्वस्थ बसली. कुमुदिनीचें औदास्य व तिचा मूकसंताप पाहून माधवला शल्य टोंचल्यासारखें झालें, पण तसें कांहीं न दाखवितां तो पुढें म्हणाला,

" हो, पण एक सांगायचं विसरलोंच मी. किनई तुझ्यासाठीं मीं एक फार सुंदर वस्तु आणली आहे, ओळख पाहूं काय आणलें असेल तें; कां एवढंसुद्धां ओळखतां येत नाहींना ? बरं तर आतां आम्हीच दाखवतों ? "

त्यानें खिशांतून एक लहानशी सुंदर मखमालीची पेटी बाहेर काढली व ती उघडून तिच्यांतून एक पाणीदार मोत्यांची माळ बाहेर काढली व ती कुमुदिनीच्या पुढें धरली.

" घाल बरं गळ्यांत, पाहूं तुला कशी दिसते ती. "

तिनें हात पुढें केला व ती माळ घेणार इतक्यांतच तो म्हणाला,

" चल आटप घाल लवकर, मला फिरून बाहेर जायचं आहे. "

हे उद्गार ऐकून तिनें पुढें केलेला हात मागें घेतला व म्हणाली,

" राहिनाक्का पेटींतच, आतांच काय घाई आहे त्याची ? "

हें ऐकून माधवला फार आश्चर्य वाटलें. जी कुमुदिनी त्यानें दिलेलें फूलसुद्धां प्रेमानें घेऊन त्याला जपत होती त्याच कुमुदिनीच्या

तोंडून असें उद्गार ऐकल्यावर त्याला कां नवल वाटणार नाहीं. ... तो ... म्हणाला,

" कुमुद, तुला मोत्याची माळ फार आवडते म्हणून मी किती-तरी दिवसांपासून एका व्यापाऱ्याला आणायला सांगितली होती, व त्यानें आज जेव्हां ही आणून दिली तेव्हां मला कितीतरी आनंद झाला; व तुलाही होईल असं वाटलं होतं पण तुला ती नीट पहाण्याची सुद्धां इच्छा नाहींना ? बरं तर आतां मीच घालतों." असें म्हणून ती माळ आपल्या हातानें तिच्या गळ्यांत घातली व अतीशय प्रेमपूर्ण दृष्टीनें तिच्याकडे पाहिलें, पण तिनें आज खूप रागवायचें म्हणून निश्चय केला होता. ती एकही शब्द बोलली नाहीं. माधवला राग आला व तो म्हणाला,

" आज तीन दिवसांनीं मी घरीं येत आहे तरी तुला माझ्या-बद्दल कांहींच कां वाटत नाहीं ? माझ्याशीं एक शब्दसुद्धां बोला-वासा वाटत नाहीं कां ? माझी तुला इतकीसुद्धां जरूर नाहीं कां ?"

" मघाच्या विकल्पानें त्याच्या मनांत पुन्हा शिरकाव केला, तो रागावून म्हणाला,

" तुला जर माझ्यापासून सुख नाहीं तर मी जातों, तुला जर दुसरीकडनं सुख मिळत आहे तर तूं कशाला माझी पर्वा ठेवशील ?"

माधव रागारागानें निघून गेला व दैवाच्या वज्राघातानें विकल झालेली कुमुदिनी जमिनीवर निश्चेष्ट पडली.

इकडे माधव रागानें निघून गेला खरा पण त्याला आज कोठेंही चैन पडेना. लग्न झाल्या दिवसापासून कुमुदिनीवर रागावण्याचा हा त्याचा पहिलाच प्रसंग होता. त्यामुळें त्याचें मन कुठेंही रेमना. शेवटीं त्यानें पुन्हा घरीं जाण्याचा निश्चय केला व मोटारची वाटही न पाहातां पायींच घरीं यावयास निघाला. येईपर्यंत त्याला संध्याकाळ झाली. बंगल्याजवळ आल्यानंतर त्याला फाटकांतून मधुकर बाहेर पडत असतांना दिसला. त्याच्या संशयाला पुष्टी मिळाली व संतापानें पेट घेतला. मधुकरानें त्याला पाहिलें नाहीं, कारण त्याचें चित्त ठिकाणावर नव्हतें. त्यानें जेव्हां माधव घरीं आहे कां म्हणून माळ्याजवळ चौकशी केली तेव्हां त्याला दुपारीं घडलेली हकीगत कळून आली. घरांत घडणारी प्रत्येक गोष्ट एक वेळ मालकाला माहित नसेल पण चाकराला ती हटकून माहित असायची.

माळ्याच्या तोंडून दुपारच्या वादळासंबंधीं सर्व ऐकल्यावर त्याला दिसून आलें कीं आतां यापुढें या घरांत आपण येणें योग्य नाहीं. कुमुदिनीची भेट न घेतां मधुकर तसाच परतला. मनाच्या अस्वस्थतेमुळें त्याला दुरून येणारा माधव दृष्टीस पडला नाहीं; पण फाटकांतून बाहेर पडत असतांना त्याला माधवानें पाहिलें व रुमाल बाहेर काढते वेळेस खिशांतून एक जमिनीवर पडलेला लहानसा चिठोराही त्यानें पाहिला. मधुकर निघून गेला. फाटकाजवळ आल्यावर माधवनें तो चिठोरा उचलून घेतला व बागेतल्या कंदि-

लाच्या अंधुक प्रकाशांत त्यानें तो चिठोरा वाचला. ' मधुकराची दृष्टि नेहमीं कुमुदिनीवरच असते, ती कधीं अन्य ठिकाणीं रमेल काय ? एवढें एकच वाक्य तिच्यांत होतें. त्यानें ती चिट्ठी उलटून पालटून दहादां वाचली. झालें ! नुसता भडका भडका उडाला ! तो झपाट्यानें वर चढून तडक कुमुदिनीच्या खोलींत गेला व तिच्या अंगावर खेंकसून म्हणाला,

" आतां कोण आलं होतं ? मी घरीं नसतांना या वेळीं कोण येऊन गेलं ? "

" कोणीही आलं नव्हतं, कोण येणार या वेळीं ? "

" काय ? मधुकर आला नव्हता ? खरं बोल ! "

" छे. कुणीसुद्धां आलं नव्हतं. "

मधुकर आला होता हें तिला खरोखरीच माहीत नव्हतें. पण तें ऐकून माधवाचा संताप उच्छृंखल झाला. तो मोठ्यानें ओरडून म्हणाला, " पापिणी ! खोटं कां बोलतेस ? आतां त्या माळ्याला बोलावून खरें करून देऊं कां ? पण जाऊं दे, जगाला कशाला दाखवायचा हा तमाशा ! तूं इतकी वाईट असशील अशी माझी कल्पना नव्हती पण आतां अगदीं खात्री झाली. चल चालती हो माझ्यासमोरून, फिरून तुझं तोंड दाखवूं नकोस जा ! "

संतापानें भणभणून गेलेलें डोकें दोन्ही हातांत गच्च धरून माधव कोचावर बसला. कुमुदिनी तेथून तावडतोब निघून गेली. संतापाचा

भर ओसरल्यावर तो हळूंच उठला व कुमुदिनी काय करते आहे तें पाहाण्यासाठीं ती ज्या खोलींत बसली होती तेथें जाऊन त्यानें हळूंच आंत डोंकावून पाहिलें. कुमुदिनी शांत मनानें गाणें म्हणत असतांना पाहून त्याला फार आश्चर्य वाटलें. तिच्या चेहेऱ्यावर कसलेंही दुःख दिसत नसून निश्चयाचें तेज चमकत होतें. तिनें हात जोडले होते, व ती अगदीं मन लावून गाणें म्हणत होती,

" पती दैवत जगिं आर्य स्त्रीस पाही
दुजा मजला ठाऊक देव नाहीं
पतीप्रेमाचा अलंकार ल्यालें
त्याच योगें मी धन्य जगीं झालें.
काय मीं अपराध असा केला
म्हणुनि प्रेमा तो सर्व लया गेला
सौख्य पूर्वीचें नाहिं आठवीलें
पादयुगुलापासून दूर केलें.
जिणें झालें हें असहनीय भारी
प्राण आतां त्यागीन मी मुरारी
दीर्घ आयू दे त्यांसि दिनानाथा
मागणें हें तुज एवढेंच आतां "

पुढें ती बोलूं लागली,

" हे दयाघना, तुला जग फार न्यायी म्हणतें पण तुझ्याजवळ

न्याय नाहीं असं मला वाटतं. माझ्या हातून कसलंही पातक न घडतां आज तूं मला प्रायश्चित्त देत आहेस ! ”

ती असें बोलत असतां माधव आपल्या खोलीकडे परतला. त्याला कांहींच समजेना. विचारानें त्याचें मस्तक सुन्न होऊन गेलें. त्यानें तें चिठोरें पुन्हा: पुन्हा वाचलें; पण कांहींच बोध होईना. पण एवढें खरें कीं आपल्या उतावळ्या कृत्याचा त्याला पश्चात्ताप झाला. किती तरी वेळ तो विचार करीत पलंगावर पडला होता. त्याचे डोळे मिठ-लेले दिसत होते, पण त्याला झोंप आली नव्हती.

× × ×

मध्यान्हरात्र झाली होती. बाहेर अतीशय काळोख पडला होता. सर्व जग निद्रेच्या पाशांत सांपडलें होतें. जिकडे तिकडे भीषण शांतता पसरली होती. अशा वेळीं कुमुदिनी दबकत दबकत हळूंच माधवाच्या खोलींत येत होती. ज्या खोलींत ती पूर्वीं हक्कानें येत होती त्याच खोलींत येण्यास आज तिचें मन कचरत होतें. ती हळूंच पलंगाजवळ जाऊन उभी राहिली. तिनें अत्यंत प्रेमपूर्ण दृष्टीनें आपलें सर्वस्व असलेल्या पतीकडे पाहिलें. तिला मागें अनुभवलेल्या सुखाची आठवण झाली व तिच्या डोळ्यांतून घळघळ अश्रूंच्या धारा वाहूं लागल्या.

माधव जागाच होता; कुमुदिनी येत आहे असें पाहून त्यानें मुद्दाम झोंपेचें सोंग घेतलें होतें. त्याच्या गालावर अश्रूंचे दोन तीन थेंब

पडले. डोळे किलकिले करून ती काय करते तें तो पाहूं लागला. ती पलंगाच्या जवळच खालीं बसली, तिनें हात जोडले व पुटपुटली.

" हे दयाघन परमेश्वरा, ह्यांना सुखी ठेव एवढंच माझं आतां तुजजवळ मागणं आहे. मी कायावाचा मनानें आजपर्यंत एकही पापकृत्य केलं नाहीं पण त्यांनीं आज मला पापी ठरवलं. मर्जी तुझी; या जन्मीं जरी माझ्यापासून त्यांना सुख झालं नाहीं तरी पुढील जन्मीं खास होईल."

ती हलकेंच उठली व माधवची शेवटची दृष्टिभेट घेण्यासाठीं त्याच्या तोंडाकडे न्याहाळून पाहूं लागली. तिचें मन मोहवश होऊं लागलें, पण त्याला कठोर करण्याचा शक्य तो प्रयत्न करून ती म्हणाली,

" नाथ माझ्या हातून कांहीं अपराध घडला असेल त्याची मला क्षमा करा. माझ्यापासून तुम्हांला सुख होत नाहीं म्हणून मी तुमच्या वाटेंतून दूर होण्याचं ठरवलं आहे. आत्महत्या हें पाप आहे असं म्हणतात, पण माझी खात्री आहे कीं, पतीच्या सुखासाठीं जर पत्नीनं थोडं पाप केलं तर त्याला दंड नाहीं."

तिनें त्याला शेवटचे डोळाभर पाहून घेतलें व मंद पावलें टाकीत दारापर्यंत गेली; पुन्हा एकदां थोडा वेळ थांबून तिनें त्याच्याकडे पाहिलें व मोठ्या कष्टानें हुंदका दाबून ती खोली बाहेर आली, व हलकेंच जिना उतरून बागेंतल्या विहिरीजवळ जाऊन उभी राहिली.

माधव तिच्यामागें आलाच होता, ती आपलें शरीर आतां विहिरीच्या आंत झोंकून देणार तोंच त्यानें पुढें होऊन तिला धरलें.

आपल्या कृत्याच्या आड कोणी तरी आलेलें पहातांच ती घाबरली व एक किंकाळी फोडून बेशुद्ध झाली. तशाच स्थितींत माधवनें तिला वर आणून बिछान्यावर निजवलें. डॉक्टरला बोलावण्यांत आलें; डॉक्टर आल्यावर त्यांनीं तपासून सांगितलें कीं "मनाला धक्का बसला, बरेच दिवसाच्या चिंतेमुळें मन हलकें झालें आहे व अन्न नसल्यामुळें शरीर कृश झालें आहे त्यामुळें धक्का फारच जाणवला; तरीपण काळजी करण्याचें कांहीं कारण नाहीं. एवढें मात्र करा कीं शुद्धीवर आल्यावर त्यांच्याशीं बोलूं नका, त्यांनाही बोलूं देऊं नका व ज्या गोष्टीमुळें धक्का बसला ती तर बिलकुल काढूं नका." वगैरे सांगून डॉक्टर निघून गेले. आतां मात्र माधवाला अतिशय वाईट वाटलें. तिच्या शुद्ध शीलांविषयीं त्याची खात्री झाली व आपल्या उताविळ्या स्वभावाचा त्याला मनस्वी राग आला.

रात्रभर तो तिच्या उशाशीं बसून होता.

पहाटे तिला खूप ताप भरला व ती बडबडूं लागली; आतां मात्र त्याला एकट्याला धीर निघेना, मित्राची किंमत त्याला कळून चुकली. ताबडतोब मधुकराला बोलवणें धाडण्यांत आलें. मधुकर आल्यावर

माधवानें त्याला सर्व कांहीं सांगितलें, व त्याच्याबद्दल मनांत कुत्सित विचार आणल्याबद्दल त्याची माफी मागितली.

एकमेकांना जास्त प्रिय झालेले ते दोघेही मित्र कुमुदिनीला बरें करण्याच्या प्रयत्नास लागले.

* * * *

हा प्रकार घडल्याला सातआठ दिवस झाले. कुमुदिनीची प्रकृति आतां सुधारावयास लागली होती. तिच्या शुश्रुषेला जी वृद्ध बाई होती तिला तिनें पुष्कळ प्रश्न विचारिले, पण तिला माधवनें व मधुकरानें कांहींही न सांगण्याबद्दल बजावलें होतें; तरीही शेवटीं तिच्याकडून कुमुदिनीला एवढें कळलें होतें कीं आपल्याला झोंप लागली म्हणजे दोघेही तिथें येऊन बसतात, दोघांचींही मनें पूर्वीं-सारखीं शुद्ध झालीं आहेत व निष्कारण भलताच आळ घेतल्याबद्दल आपल्या पतीला वाईट वाटत आहे. ह्यामुळें तिला बरें वाटलें. तिनें त्या दाईला माधवला बोलवून आणायला सांगितलें. माधव आल्यावर तिच्या तरतरीत चेहऱ्याकडे पाहून त्याला आनंद झाला. तो तिच्या पलंगावर येऊन बसला व म्हणाला,

" कुमुद, बरं वाटतंय ना तुला आतां ? "

" हो, आज बरीच हुषारी वाटत आहे. "

" लवकरच बरी होशील तूं. माझ्या मूर्खपणामुळें तुला किती त्रास भोगावा लागला हा ! कुमुद, मला क्षमा कर, मी तुला निष्का-

रण फार छळलें. तुझ्यासारखी सद्गुणसंपन्न स्त्री मला मिळाली हें माझं केवढं भाग्य ! जर मी त्या रात्रीं जागा नसतो तर या सुंदर रत्नाला कायमचा मुकलों असतों. कुमुद, पण मला क्षमा करशील ना ? ”

तिचा हरपलेला सुखाचा ठेवा तिला परत मिळाला, तिचा कंठ दाटून आला, डोळ्यांत आनंदाश्रूंनीं गर्दी केली.

“ हें काय बरं ! आपण माझा काय अपराध केला म्हणून मी आपल्याला क्षमा करायची ? आपण माझी क्षमा मागावी इतकी माझी योग्यता नाहीं. उलट माझ्या वेडेपणामुळं तुम्हांला किती वेदना झाल्या याचंच मला वाईट वाटत आहे.

“ बरं, तुझंही नको आणि माझंही नको; आपण दोघे मिळून ज्यानें हा सुदीन दाखविला त्या परमेश्वराचीच, त्याला सुखाच्या काळांत विसरलों होतों म्हणून क्षमा मागूं.

तें प्रेमळ जोडपें आनंदाच्या शिखरावर आरूढ झालं. थोड्या वेळानें मधुकर पलीकडल्या दालनांत बसला होता, त्याला माधवनें हांक मारली. दोघांच्या आनंदी मुद्रा पाहून त्याला फार आनंद झाला. केवळ आपल्यामुळें त्या दोघांत वितुष्ट आलें म्हणून त्याला फार वाईट वाटत होतें, पण आतां त्या दोघांचें हें गोड ऐक्य पाहून त्याच्या मनाला गुदगुल्या झाल्या.

कुमुदिनीनें विचारिलें, “ भावोजी, हें सगळं कशामुळं झालं हें मला कळेल का ?

मधुकरानें हंसत हंसत तिच्यापुढें तें चिठोरें केलें, तें पाहून तिला कांहींच बोध होईना.

" वहिनी, तुम्हांला माहीत आहेच कीं मी गोष्टी लिहीत असतों. तुम्ही माझ्या कित्येक गोष्टी वाचल्याही आहेत. तशीच एक गोष्ट लिहीत होतों. बराच वेळ लिहिल्यावर एक वाक्य अर्धेंच राहिलें व पुढें काय लिहावें हें सुचेना म्हणून मी तसाच उठलों. बऱ्याच वेळानं डोकें शांत झाल्यावर हें वाक्य आठवलें; विसरूं नये म्हणून लगेच चिठोऱ्यावर लिहून खिशांत ठेवलें, तें खिशांतून कांहीं बाहेर काढीत असतांना खालीं पडलें व आपल्या दिव्य पतिराजांना सांपडलें. एखादा असता तर विचारता पण याचं सगळेच कांहीं जगा वेगळें. तेव्हांच जर त्यानं मला विचारलं असतें तर एवढा घोंटाळा कशाला झाला असता. "

यावर कुमुदिनी म्हणाली,

" त्यांचा कांहीं दोष नाहीं, ते आतांशा घरीं नसत म्हणून मीच रागावून त्यांच्याशीं तुटकपणानं वागलें. त्याचाच हा परिणाम ! "

माधव म्हणाला, " हें बघ मधुकर, नवरा कितीही वाईट असला तरी त्याला वाईट म्हटलेलं बायकांना खपत नाहीं. उगीच तुझ्यावरच रागवायची ती; तेव्हां आतां आपण हा विषयच बदलूं. "

नंतर तीं तिघेही बराच वेळ बोलत बसलीं होतीं. वेळ झाल्यावर मधुकर जाण्यास उठला. जातांना तो म्हणाला,

" माधव, वहिनी, आतां तुम्ही दोघेही आनंदांत रहा व एक-मेकांबद्दल विनाकारण संशय घेत जाऊं नका. मी आतां जातो; ह्यापुढें मी येथें येणार नाहीं. माझ्यामुळें कोणाच्याही सुखांत व्यत्यय आलेला मला आवडत नाहीं. मी तुमच्यावर रागावलों असें मुळींच समजूं नका. ज्या वेळेला माझ्या साह्याची जरूर लागेल त्या वेळीं माधव, तुझा हा मधुकर केव्हां धावून यायला तयार आहे. जातों मी आतां. मला आनंदानें निरोप द्या. "

त्याचे हे उद्गार ऐकून माधवला व कुमुदिनीला फार वाईट वाटलें. त्यांनी त्याला असें न करण्याबद्दल पुष्कळ सांगितलें; शेवटीं निर्वाणीचा उपाय म्हणून माधवनें त्याचे पाय धरले पण तो आपल्या निश्चय-ा पासून ढळला नाहीं.

" मी तुमच्यावर रागावलों नाहीं, पण मला या गांवांतून जाय-लाच पाहिजे. जातों मी आतां. " असें म्हणून तो निघून गेला. माधवाला मनस्वी वाईट वाटलें, तो म्हणाला,

" कुमुद, मी ह्या संशयी स्वभावामुळें भावापेक्षांही जास्त प्रेम करणाऱ्या मित्राला मुकलों. मला आतां चांगलीच अद्दल घडली. यापुढें माझ्या मनांत संशयाला थोडीसुद्धां जागा मिळणार नाहीं. मधुकर माझ्यासाठीं अविवाहित राहून सर्व जन्म एकटेपणानें घाल-विणार ! त्यानें माझ्यासाठीं किती स्वार्थत्याग केला व मी मात्र

त्याची फेड कृतघ्नपणानें केली. देवा, मधुकराला सुखी ठेव. " असें म्हणून त्यानें आपल्या डोळ्यांतील अश्रू पुसले.

ते दोघेही आतां आनंदानें संसार करूं लागले होते. कुमुदिनीच्या आनंदाला तर आतां पारावार नव्हता. मात्र मधुकरची आठवण झाल्याशिवाय त्यांचा एकही दिवस जात नसे.

कुमुदिनी मात्र नेहमीं म्हणत असते कीं " माझें सौख्य मला केवळ संशयामुळेंच परत मिळालें. "

* * *

४२५१

समाप्त.

REFBK-0004251

REFBK-0004251